cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२२४ | शनिवार, दि.०७ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

'लाडक्या बहिणी' आता सरकारला भार वाटू लागल्या

महायुतीने निवडणूक प्रचारात पुन्हा सत्ता मिळाल्यास लाडक्या बहिणींना दीड हजार ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. ती आता सत्ता मिळाल्याने पूर्णत्वास नेण्याशिवाय पर्याय नाही. लाडक्या बहिणींमुळे सत्ता मिळाली पण कर्जबाजारी राज्याचा विचार कोण करणार? राज्यकर्त्यांनी जनतेने न मागता मतांसाठी मतदारांना खुश करण्यासाठी त्यांच्यावर सवलतींचा वर्षाव केला. सरकार कोणाचेही असो निवडणुका जवळ आल्या की ते सवलतींचा वर्षाव करते.

राहुल गांधींच्या नागरिकत्वाबाबतच्या याचिकेवर केंद्राने भूमिका स्पष्ट करावी – दिल्ली हायकोर्ट

नवी दिल्ली :भ ाजपचे जेष्ठ नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाच्या मुद्द्यावर दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. या याचिकेवर केंद्र सरकारने भूमिका स्पष्ट करावी, असे दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी म्हटले आहे. राहुल गांधींविरोधात केलेल्या तक्रारीचा स्थिती अहवाल दाखल करण्यासाठी केंद्र सरकारला निर्देश देण्याची मागणी सुब्रमण्यम स्वामी यांनी केल्यावर न्यायालयाने हा आदेश दिला. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती विभू बाखरू आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. केंद्र सरकारच्या वकिलांना अलीकडेच वरिष्ठ वकील म्हणून नियुक्त करण्यात आले आहे आणि त्यामुळे हे प्रकरण नवीन वकिलांकडे सोपवावे लागेल, असल्याचे सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले.

शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास केंद्र सरकारचा नकारच

विरोधकांच्या मागणीला बगल देत गोलगोल उत्तर

नवी दिल्ली । वृतसंस्था

देशभरातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी काही निर्णय घेतला जाईल का आणि त्यासाठी केंद्र सरकारकडून फ्रेमवर्क तयार करण्यात येईल का? असा प्रश्न शुक्रवारी (दि.६) खासदार मनोज झा यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विचारला. या प्रश्नाच्या उत्तरात नेहमीप्रमाणे मोदी सरकार शेतकऱ्यांच्या हिताला कसे प्राधान्य देते, आणि त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न कसे

वाढवले जाणार आहे, यावर चौहान यांनी भर दिला. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सरकार काम करत आहे, जेणेकरून कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांना वारंवार हात पसरवण्याची वेळ येणार नाही, असेही चौहान म्हणाले. याचा अर्थ स्पष्ट आहे की, केंद्र सरकारची देशपातळीवर शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याची इच्छा नाही.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकार नेमके काय करते, असा प्रश्न राज्यसभेत विचारण्यात आला. शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न करण्याची नरेंद्र मोदींनी घोषणा केली होती. २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू, असेही मोदी सांगत होते.

सरकारच्या निर्णयाने शेतकऱ्यांचे नुकसानच

खरे म्हणजे केंद्र सरकारने सोयाबीन, कांदा, तांदळाचे दर पाडले. केंद्र सरकारने मागच्या पाच वर्षात खाद्यतेल आयात वाढवली. खाद्यतेल आयात शुल्क शून्यावर आणले. त्यात दोन वर्षांपूर्वी सोया डिओसी आयात केली. त्यामुळे मागच्या आणि चालू हंगामात सोयाबीन उत्पादकाच्या ताटात माती कालवली गेली. चालू हंगामातही सोयाबीनच्या किफायतशीर दरासाठी सोया डिओसीच्या निर्यातीला अनुदान देण्याची मागणी जाणकार करत आहेत, पण केंद्र सरकार त्याला सकरात्मक प्रतिसाद देत नाही. त्यामुळे कृषिमंत्री चौहान कर्जमाफी न देताही शेतकऱ्यांचे हात बळकट नेमके करणार कसे? हा प्रश्न शिल्लक राहतो. कारण सध्या सोयाबीनचे दर तर हमीभावाच्या खाली आहेत. खरेदीची घोषणा झाली पण खरेदीची कासवगती पाहता शेतकऱ्यांचे व्हायचे ते नुकसान झाले आहे. कांदा आणि तांदळाच्या बाबतीतही सरकारने असेच निर्णय घेतले जे शेतकऱ्यांसाठी नुकसानदायी ठरले.

२०१४ पूर्वी तर स्वामीनाथन आयोगाच्या सी २ सूत्रावर आधारित दीडपट हमीभाव देण्याचा दावाही मोदींनी केला होता.

सध्या तामिळनाडू, पंजाब आणि विविध राज्यातील शेतकरी आंदोलन,उपोषण करत आहेत. मग स्वामिनाथन समितीच्या शिफारसशीचे काय झाले? असा प्रश्न एमडीएमकेचे खासदार वाईको यांनी विचारला. त्यावर युपीए सरकारच्या काळातच स्वामीनाथन समितीच्या शिफारशी लागू करण्यास विरोध करण्यात आला होता. विशेषतः उत्पादन खर्चावर ५० टक्के किमान आधारभूत किंमत म्हणजेच हमीभाव देण्याला युपीए सरकारने विरोध केला, असे चौहान म्हणाले. यावेळी त्यांनी देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार आणि इतर मंत्र्यांची ऑन रेकॉर्ड स्टेटमेंटही वाचून दाखवले. ◀◀ पान २ वर

शंभू सीमेवर शेतकऱ्यांचा पुन्हा एल्गार

पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या

नवी दिल्ली । वृतसंस्था

हरियाणाच्या अंबालाजवळील शंभू सीमेवर सुमारे ९ महिन्यांपासून आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी शुक्रवारी (दि.६) दिल्लीकडे कूच करण्याचा प्रयत्न केला. यावेळी शेतकऱ्यांनी बॅरिकेट्स तोडले. यादरम्यान शेतकऱ्यांना पांगवण्यासाठी हरियाणा पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. या दरम्यान एक शेतकरी जखमी झाला. ◀◀ पान २ वर

मराठवाड्याच्या विकासासाठी पंकजा मुंडेंना मंत्रिपद हवच!

बीड जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांना सुद्धा मिळणार बळ

बीड । प्रतिनिधी

राज्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकार स्थापन झाले आहे. त्यांच्यासह एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. मंत्रिमंडळ विस्तार हा १२ डिसेंबर पर्यंत होईल असे म्हटले जात आहे. बीडमधून धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे. पंकजा मुंडे यांना कॅबिनेट मंत्री पदाची संधी दिली तर बीड जिल्ह्यासह मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळू शकते.

तसेच सर्वाधिक आमदार असलेल्या भाजपला मराठवाड्यामध्ये आपली ताकद आणखी वाढवण्याची संधी त्यातून मिळू शकते.

लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात भाजप महायुतीला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला होता. मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये सर्वात मोठे यश महायुतीला मिळाले. बहुमत मिळाले असूनही सरकार स्थापन करायला १३ दिवस लागले. अखेर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. खाते वाटपाचा तिढा कायम असल्याने कॅबिनेट आणि राज्यमंत्र्यांचा शपथविधी झाला नाही. १२ डिसेंबर पर्यंत शपथविधी होईल असे सांगितले जात आहे. बीड जिल्ह्यामधून पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांना संधी दिली जाण्याची दाट शक्यता असून पंकजा मुंडे यांचा समावेश फडणवीस सरकारमध्ये होईल, अशी अपेक्षा मुंडे समर्थकांना आहे. मराठवाड्यामध्ये ४६ पैकी १९ ◀◀ पान २ वर

जिल्ह्यात भाजपला येतील चांगले दिवस

महायुती झाल्यापासून बीड जिल्ह्यातील भाजपा बॅक फुटवर गेल्याचे दिसत आहे. बऱ्याच मतदारसंघांमध्ये तालुकास्तरीय नेत्यांनी भाजपला रामराम केलेला आहे. कार्यकर्ते सुद्धा हाताश झाल्याचे विधानसभा निवडणुकीत दिसून आले. पंकजा मुंडे यांना कॅबिनेट मंत्री केलं तर बीड जिल्ह्यात पुन्हा भाजप पूर्वीच्या क्षमतेमध्ये दिसून येईल.

माजी मंत्री मधुकर पिचड यांचे निधन

नाशिकः माजी मंत्री मधुकर पिचड यांचे निधन झाले आहे. ते ८४ वर्षांचे होते. ब्रेनस्ट्रोक आल्याने नाशिक येथील नाइन पल्स रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान, त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मधुकर पिचड यांनी १९८० ते २००४ या काळात नगरमधील अकोले विधानसभा मतदारसंघातून विधानसभेचे आमदार म्हणून सलग सात वेळा काम केले आहे. मार्च १९९५ ते जुलै १९९९ या काळात ते महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. मधुकर पिचड राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे ◀◀ पान २ वर

नदी जोड प्रकल्पावर अधिक भर राहणार–देवेंद्र फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

'ग्रीन एनर्जी, नदी जोड प्रकल्पावर माझा भर राहणार आहे. हे प्रकल्प महाराष्ट्राला कायमचे दुष्काळमुक्त करू शकतात. राज्याच्या विकासाठी हाती घेण्यात येणारे सगळे प्रकल्प वेगाने पूर्ण होतील,' असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. सह्याद्री वाहिनीवरून प्रसारीत

झालेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, 'मुंबईतील मढपासून विरारपर्यंत सी–लिंक तयार करण्याची योजना आहे. यासाठी जपानी तंत्रज्ञानाची मदत घेतली जाईल. मुंबईकरांचा प्रवास कमी करण्यासाठी आणि ट्रॅफिकपासून मुक्त करण्यासाठी प्रयत्नशील आहे. ३७५ किमीचे मेट्रोचे काम होणार आहे. मेट्रोमुळे मुंबईकरांचे तीन तास वाचणार आहेत.' ◀◀ पान २ वर

विधानसभेचे विशेष अधिवेशन आजपासून

आमदारांना शपथ देण्यासह बहुमताचा ठराव मांडणार, तीन दिवस चालणार अधिवेशन

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात नव्याने सत्तेवर स्थानापन्न झालेल्या संशयातीत बहुमाताचा आकडा गाठणारे भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार सत्तास्थानी विराजमान झाले. सांसदिय प्रथेप्रमाणे विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावून त्याद्वारे राज्यातील नवनिर्वाचित आमदारांना शपथ देणे आणि

विधानसभेत बहुमत सिद्ध करणे आदी गोष्टी करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी विधानसभेचे खास अधिवेशन शरिवार ७ तारखेपासून बोलावले आहे.

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विधानसभेची बैठक विधानभवन, मुंबई येथे शनिवार, ७ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११ वा. आयोजित केली असल्याची माहिती महाराष्ट्र विधानसभेचे सचिव ◀◀ पान २ वर

बाबासाहेबांचे कार्य पुढे घेऊन जाणे हेच त्यांना खरे अभिवादन –राज्यपाल

मुंबई । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वोत्कृष्ट राज्यघटना आपल्याला दिली. या घटनेने सर्वांना समान अधिकार आणि देशाला एकता, समता, बंधुतेचा विचार दिला. अस्पृश्यता निवारण, जातीमुक्त समाजनिर्मितीत डॉ. बाबासाहेबांनी सर्वाधिक योगदान दिले. डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या ◀◀ पान २ वर

प्रार्थनास्थळ कायदा १९९१ रद्द करा; हिंदू पक्षाच्या मागणीला मुस्लिमांचा विरोध

दिल्ली । वृतसंस्था

भारतातील धार्मिक स्थळांची स्थिती १५ ऑगस्ट १९४७ला होती तशी ठेवण्याची तरतुद करणारा प्रार्थनास्थळ कायदा १९९१ रद्द केला जाऊ नये, अशा मागणीची याचिका मुस्लिम पक्षाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. हा कायदा रद्द करण्याची मागणी करणारी याचिका हिंदू पक्षाने २०२० ला दाखल केली आहे, यावर मुस्लिम पक्षाने हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे.

६ डिसेंबर १९९२ला अयोध्येत बाबरी मशिद पाडण्यात आली. त्यानंतर देशात हिंसाचाराचा आगडोंब उसळला होता. पुढे दीर्घकालीन न्यायिक प्रक्रियेनंतर वादग्रस्त जागी श्रीराम मंदिर ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: ४.०० क्विंटल			
	२,७१८	२,७२०	२,७१९
ज्वारी/हायब्रिड: २०.५० क्विंटल			
	२,१५१	२,९३०	२,४६३
मका/लोकल: ७.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : २२.०० क्विंटल			
	६,२०१	६,८५०	७,५००
उडीद : ०.५० क्विंटल			
	६,०००	६,०००	६,०००
बाजरी: १४.०० क्विंटल			
	२,२००	३,१०१	२,४९७
मुग : २.५० क्विंटल			
	७,३०१	७,३०१	७,३०१
सोयाबीन: ३४५.५० क्विंटल			
	३,५००	४,२८०	४,०९३
हरभरा: २.०० क्विंटल			
	४,४०१	६,८०१	५,४०१

शरद पवार उद्या मारकडवाडीत!

बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा प्रयत्न करणारे देशातील पहिले गाव

राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचे नेतेही लवकरच देणार भेट

सोलापूर । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे रविवारी मारकडवाडी येथे येणार आहेत. सकाळी साडेनऊ वाजता शरद पवार हे हेलिकॉप्टरने मारकडवाडीत येतील. ईव्हीएम विरोधातील देशात मारकडवाडी हे पहिले गाव होते ज्याने बॅलेट पेपरवर मतदान घेण्यासाठी आंदोलन केले होते. याच ठिकाणी आता राहुल गांधींसह इंडिया आघाडीचे नेतेही लवकरच भेट देणार असून, रविवारी शरद पवार पहिल्यांदा इथे पोहोचणार आहेत.

माळशिरसचे आमदार आणि या आंदोलनाचे नेते उत्तमराव जानकर यांचा शपथविधी देखील रविवारीच होणार होता.

मात्र, त्यांनी आता अध्यक्षांची परवानगी घेऊन सोमवारी अध्यक्षांच्या दालनात शपथ घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी हे गाव राज्यभर चर्चेत आले आहे. कारण या गावातील नागरिकांनी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी केली होती. यासाठी आंदोलन देखील केले. ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची संपूर्ण तयारी ◀◀ पान २ वर

मारकडवाडीतील ग्रामस्थांवर गुन्हा दाखल

बॅलेट पेपरवरील मतदान प्रक्रियेसाठी पुढाकार घेणाऱ्या मारकडवाडीतील १७ जणांसह अन्य १०० ते २०० ग्रामस्थांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालावर परिणाम करण्याच्या उद्देशाने ईव्हीएम मशीन संदर्भात अफवा पसरवून फेरमतदानाची तरतूद नसताना प्रशासनाचे आदेश डावलल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बॅलेट पेपरवर मतदान करण्यासाठी नागरिकांना आवाहन करुन भीती निर्माण करत समाजात द्वेषाची भावना निर्माण केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. बीएनएस ३५३(१) (ब), १८९ (१), (२), १९०, २२३ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. माळशिरसच्या नातेपुते पोलीस ठाण्यात सर्व आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

अग्रलेख

‘लाडक्या बहिणी’ आता सरकारला भार वाटू लागल्या

महायुतीने निवडणूक प्रचारात पुन्हा सत्ता मिळाल्यास लाडक्या बहिणींना दीड हजार ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. ती आता सत्ता मिळाल्याने पूर्णत्वास नेण्याशिवाय पर्याय नाही. लाडक्या बहिणींमुळे सत्ता मिळाली पण कर्जबाजारी राज्याचा विचार कोण करणार? राज्यकर्त्यांनी जनतेने न मागता मतांसाठी मतदारांना खुश करण्यासाठी त्यांच्यावर सवलतींचा वर्षाव केला. सरकार कोणाचेही असो निवडणुका जवळ आल्या की ते सवलतींचा वर्षाव करते. एकदा का सत्ता मिळाली की ते आपले खरे रूप दाखवतात. केवळ निवडणुकीपुरती स्वस्ताई आणायची आणि नंतर महागाईला थैमान घालू द्यायचे! असे होऊ नये म्हणून सरकारने वास्तवाचे भान ठेवून कोणत्याही योजना राबवाव्यात. महागाईचा फटका सर्वसामान्यांना बसतो हे लक्षात ठेवून पावले उचलायला हवीत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी एकनाथ शिंदे सरकारने महिलांना महिन्याला दीड हजार रुपये देण्याची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली. त्याचा परिणाम निवडणुकीत मतांचा पाऊस पडण्यात दिसला. या योजनेमुळेच महायुतीला एकहाती सत्ता मिळाली असे म्हणता येईल. पण ही योजना राबविण्यासाठी इतर सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणारा आर्थिक लाभ स्थगित ठेवून त्याचे पैसे लाडक्या बहिणींसाठी वापरले अशी चर्चा आहे. या लाडक्या बहिणींसाठी १७ हजार कोटी खर्च होत आहेत म्हणे. त्यामुळे राज्याचा आर्थिक विकास खुंटला असून राज्याच्या कर्जात दोन हजार कोटींची वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत २०२४ च्या अर्थसंकल्पात दीड हजार रुपयांप्रमाणे ४५ हजार कोटींची तरतूद केली होती. त्यानुसार जुलै २०२४ पासून पात्र महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली. नोव्हेंबरपर्यंत अडीच कोटी महिलांच्या बँक खात्यात दीड हजार रुपयांप्रमाणे पैसे जमा करण्यात आले. नव्या सरकारला वाढीव हप्त्यासाठी मोठी अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागणार असून त्यासाठी आर्थिक स्थितीचा पुन्हा एकदा आढावा घ्यावा लागणार आहे. नव्या सरकारकडून मांडल्या जाणाऱ्या पूर्ण अर्थसंकल्पामध्ये आर्थिकदृष्ट्या शक्य असेल तरच निधी वाढवण्याचा फेरविचार केला जाऊ शकतो. फडणवीस सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे.

पूर्ण अर्थसंकल्प मांडल्याशिवाय वाढीव निधीचा मार्ग सुकर होण्याची शक्यता नाही असे दिसते. राज्यावर कर्जाचा बोजा वाढत असल्याने योजनेतील निधीमध्ये वाढ केली जाऊ नये, असे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे सध्या दिली जाणारी मासिक दीड हजार रुपये रक्कम कायम ठेवावी अशी या अधिकाऱ्यांची सूचना आहे म्हणे. वाढीव निधीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्याचे आश्वासन शिंदे यांनी दिले होते. परंतु आता ते मुख्यमंत्री नसल्याने आणि निवडणूकही झाली असल्याने नव्या रेवड्यांची घोषणा करण्याची नव्या सरकारला गरज नाही. शिंदे सरकारने योजनांवर सढळ खर्च केल्याने आता अर्थमंत्रालयाला हात आखडता घ्यावा लागणार आहे. अर्थमंत्रालयाची जबाबदारी अजित पवार यांच्याकडेच राहण्याची शक्यता असल्याने त्यांनाही आर्थिक नियोजनावर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. अजित पवारसुद्धा वाढीव निधीच्या आश्वासनांचा फेरविचार करतील असा अंदाज आहे.

वाढीव रक्कम देण्याचे आश्वासन पाळले गेले नाही तर ती मतदारांची फसवणूक ठरेल असेही नाही. कारण मोदी सरकारने प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये देण्याचे आश्वासन तरी कुठे पाळले? तरीही मतदारांनी भाजपला मते दिलीच ना. त्यामुळे वाढीव रक्कम दिली नाही म्हणून लाडक्या बहिणी नाराज होतील असे नाही. दीड हजार तर दीड हजार. लाडक्या बहिणींच्या कागदपत्रांची पडताळणी होणार आहे म्हणे. त्यात त्रुटी आढळल्यास त्यांना योजनेला मुकावे लागणार आहे. नवे सरकार पात्र महिलांच्या कागदपत्रांची तपासणी करणार आहे. त्यानुसार खोटे दावे करणाऱ्या किंवा फसवणूक करणाऱ्या लाभार्थींना योजनेतून वगळण्यात येणार आहे. जे लाभार्थी निवृत्तिवेतनधारक आहेत, ज्यांच्याकडे चारचाकी वाहन आहे, ज्या महिलांच्या नावावर पाच एकरपेक्षा अधिक जमीन आहे अशा लाभार्थींना या योजनेतून बाद केले जाणार आहे. एका कुटुंबातील फक्त दोन महिलांनाच या योजनेचा लाभ मिळेल. मते जिंकण्यासाठी ज्यांचा ‘लाडक्या बहिणी’ असा उदो उदो झाला त्याच आता राज्याला भार ठरणार आहेत असे दिसते.

युवा पिढी बरबाद करणारी परंपरा घातक

जत्रा महोत्सवातील अवैध धंदे बंद करा–सतीश वाघमारे

वडवणी प्रतिनिधी

लोकमानस साप्ताहिकाचे संपादक सतीश वाघमारे यांनी वडवणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे ग्रामीण भागातील जत्रा महोत्सवातील अवैध धंदे बंद करा अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागात जत्रा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या जत्रा महोत्सवात खुले आम–अवैद्य धंदे गावकऱ्यांच्या वतीने सुरू असून यामुळे तरुण पिढी बरबाद होत आहे ग्रामीण भागातील गावा गावात जत्रा भरवल्या जातात जत्रेचा खर्च हा अवैध धंद्याच्या लिलावातून केला जात आहे दारू, पत्त्यांचा क्लब,सुरट इत्यादी सारख्या अवैद्य धंद्याचा गाव कमिटीच्या वतीने लिलाव पुकारला जातो आणि सर्रासपणे जत्रेमध्ये अवैध्य धंदे सुरू असतात त्यामुळे गावातील व पंचक्रोशीतील तरुण पिढी अवैधे धंद्याच्या नादी लागुन बरबाद होत आहे गावातील अंगणवाडी,शाळ ही विद्यामंदिरे अवैध धंद्यासाठी दिल्या जातात त्यांचे पावित्र्य धोक्यात आले आहे हे थांबले पाहिजे,तरुण पिढी अवैधे धंद्यामुळे बरबाद होण्यापासून वाचावी यासाठी ग्रामीण भागातील जत्रा महोत्सवातील अवैध धंदे बंद करावेत अशी मागणी लोकमानस साप्ताहिकाचे संपादक सतीश वाघमारे यांनी निवेदनाद्वारे वडवणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे केली आहे.

नागवंशी बुद्धविहारमध्ये महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.आंबेडकर यांना अभिवादन

वडवणी । प्रतिनिधी

भारत देशातच नव्हे तर संपूर्ण विश्वात ज्ञानाचा अंथाग महासागर बौद्धीसत्व विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ६८ व्या महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन करण्यात आले.आज दि ६ डीसेबंर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता वडवणी शहरातील नागवंशी बौद्धविहार येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन करण्यात आले.सुरुवातीला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दोन मिनिट स्तब्ध उभा राहुल श्रद्धांजली वाहीली.त्यानंतर वंदना घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न पत्रकार सतीश मुजमुले यांनी केला.त्यानंतर बाटींचे समन्वयक महादेव तुरे यांनीही दोन शब्द बोलुन श्रद्धांजली अर्पित केली.शेवटी बौद्धविहारचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी सांगीतले एका विचाराचे दहा माणसं एकत्र येऊन कार्यक्रम

यशस्वी करु शकतात आपण तर मोठ्या संख्येने आहोत.म्हणुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा रथ पुढे घेऊन जायचा असेल तर प्रत्येकाचं योगदान चळवळीसाठी आवश्यक आहे. या अभिवादन सभेचे आयोजन भालेराव मित्र मंडळाचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी केले होते.यावेळी शहरातीलच नव्हे तर तालुकाभरामधुन चळवळीतील व विविध संघटनेतील मान्यवंरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.या अभिवादन सभेचं सुत्रसंचालन लोकमाणसचे संपादक सतीश वाघमारे यांनी केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

माजलगाव । प्रतिनिधी

महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिजामाता नर्सिंग कॉलेज अँड जिजामाता फिजिओथेरपी कॉलेज माजलगाव येथे महामानवाच्या स्मृतीस सर्व शिक्षक आणि कर्मचारीवृंद तसेच कॉलेजच्या सर्व विद्यार्थ्यांनी विनम्र अभिवादन केले.यावेळी राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले याप्रसंगी नर्सिंग कॉलेजचे कुलकर्णी सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आपल्याला आयुष्यामध्ये पुढे जायचे असेल तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात केले पाहिजे असे प्रतिपादन केले यावेळी उपस्थित असलेले फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य के करुणाकरण सर, ऑफिस सुप्रीटेडंट वाघ सर, उपप्राचार्य प्रवीण कुमार सर, इरफान पठाण सर व सर्व शिक्षक वृंद आणि कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानगर पालिकेची कर न भरल्यास अतिरिक्त आयुक्त जप्तीची कारवाई करणार

जालना । प्रतिनिधी

जालना येथील महानगर पालिका ही गेल्या काही दिवसापासून डबघाईला आलेली आहे म्हणून. म्हणून स्वतः अतिरिक्त आयुक्त मैदानात उतरल्या आहेत. त्यांनी ही वसूली मोहिम तीव्र करण्याबरोबरच जप्तीची कारवाई देखील त्या करु लागल्याचे चित्र समोर आले आहे.

आतापर्यंत जालना शहर महानगर पालिके ने वीसहून अधिक मालमत्तांवर कारवाई केली आहे तसेच यापुढे अशीच कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे शहर आणि परिसरात मोठी खळबळ उडाली असून आपल्याकडील मालमत्तांची थकबाकी असेल तर ती तात्काळ भरावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरीकांनी त्यांच्याकडे असलेल्या कराचा भरणा न केल्यास स्थावर किंवा जंगम मालमत्ता जप्त करण्यात येणार असल्याचे समजते. ३१ मार्च पूर्वीच हा भरणा महानगर पालिकेकडे करावा, नसता आपल्या मालमत्ता सील करण्यात येतील, असा इशाराही या पथकाने दिला आहे. अतिरिक्त आयुक्तसह त्यांच्या टीममधील कर्मचारी अधिकारी यांनी केला आहे.

माजलगांवच्या खंडोबा मंदीरात सदानंदाचा येळकोट येळकोट जय मल्हारच्या गजरात दिपोत्सव

माजलगांव । प्रतिनिधी

आठरा पगड जातींचा माजलगांचा देव श्री खंडोबा मंदीरात नागदेवे निम्मित दि ०६ डिसेंबर शुक्रवार रोजी सायंकाळी ७:०० वाजता भक्तांचा उपस्थित २१०० दिवे लावून दिपोत्सव साजरा केला. माजलगांव येथील सर्वांचे आराध्य दैवत व कुलदैवत श्री खंडोबा मंदीरात शुक्रवार रोजी सकाळ पासुन भक्तांनी दिपोत्सव ची जयत तैयारीला सुरवात केली मंदीरात रंग –बेंरंगी रांगोली काढुन ,जय मल्हार नावाची प्रतिकृती ,स्वतिक दिव्याने काढुन व मंदीर दिव्यानी सजवली.दिव्यामध्ये तेल टाकुन कापसाची वात टाकुन बुधवारी सायंकाळी २१०० दिवे(पणती) लावून मंदीर परिसरातील सर्व लाईट बंद करण्यात आली .दिव्यानीं मंदीर परिसर उजलुन निघाले.दिव्यांच्या प्रकाशामध्ये भक्तांचा हस्ते आरती करण्यात आली.यावेळी येलकट येलकट जय मल्हार चा गजर करण्यात आला दिपोत्सव पाहण्यासाठी भक्तांनी गर्दी केली होती.



मुंबई: महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि मार्गदर्शक राजा माने यांची मुंबईत भेट घेत दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्राची माहिती पुस्तिका वसंत मुंडे यांनी त्यांना दिली.यावेळी पत्रकारांच्या मागण्यांबाबत नवीन सरकारकडे पाठपुरावा कराण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

पान १ वरून...

शेतकऱ्यांना कर्जमाफी

मोदी सरकारने सत्तेत येताच म्हणजेच २०१९ पासूनच उत्पादन खर्चावर ५० टक्के हमीभाव जाहीर केल्याचे सांगत चौहान यांनी आकडेवारीही दिली. स्वामिनाथन समितीच्या शिफारशीनुसार हमीभाव जाहीर केल्याचा चौहान यांच्या बोलण्याचा अर्थ होता. परंतु वास्तवात मात्र मागील दहा वर्षात केंद्र सरकारने उत्पादन खर्चावर ५० टक्के हमीभाव जाहीर करताना स्वामिनाथन समितीच्या सी २ च्या सूत्राचा स्वीकार केलेला नाही. त्याऐवजी ए २+एफएलचे सूत्र वापरून त्यावर ५० टक्के हमीभाव जाहीर केला आहे. विशेष म्हणजे हेच सूत्र वापरून डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकारही हमीभाव जाहीर करत होते. त्यामुळे उत्पादन खर्चावर ५० टक्के हमीभाव जाहीर केल्याच्या दाव्यातलं अर्धसत्य झाकून ठेवले जाते. कारण सत्तेवर आलो तर स्वामिनाथन समितीच्या शिफारशी लागू करू, असे मोदी यांनी आश्वासन दिले होते. वाईको यांचा प्रश्न सी २ नुसार उत्पादन खर्चावर ५० टक्के हमीभाव जाहीर करणार का, असा होता पण शिवराज सिंह चौहान यांनी त्याला फाटा देत सरकार हमीभावाने खरेदी करत असल्याचे सांगितले. एवढेच नाही तर केंद्र सरकारने सोयाबीन, कांदा, आणि तांदळाचे दर पडले म्हणून या शेतमालाच्या निर्यातीवरील निर्बंध मोकळे केल्याची शेखी शिवराजसिंह चौहान यांनी मिरवली.

मराठवाड्याच्या विकासासाठी

जागा भाजपने जिंकलेले आहेत. जवळपास ४५% आमदार हे भाजपचे असल्याने पंकजा मुंडे यांच्या सारखे खंबीर नेतृत्व मराठवाड्याच्या विकासासाठी आवश्यक आहे. २०१४ ते १९ या कार्यक्रमांमध्ये मंत्री म्हणून पंकजा मुंडे यांनी मराठवाड्यामध्ये आणि बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली होती. शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्या, जलयुक्त शिवार योजना, महिलांसाठी राबवलेले उपक्रम, अंगणवाड्यांचे सक्षमीकरण यासह विविध विकास कामे आजही मराठवाड्यातील जनतेच्या स्मरणामध्ये आहेत. त्यामुळे पंकजा मुंडे यांना कॅबिनेट मंत्री पदी संधी दिली तर बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी त्या शर्तीने प्रयत्न करू शकतात असे म्हटले जात आहे. यावेळी पुन्हा संधी मिळाली तर पाच वर्षे मंत्री म्हणून काम केलेल्या अनुभवाचा फायदा होऊ शकतो. बीड जिल्ह्यामध्ये भाजपचे दोन आमदार आहेत. येणाऱ्या काळामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि नगरपंचायतच्या निवडणुका आहेत. पंकजा मुंडे मंत्री झाल्या तर त्याचा फायदा सुद्धा या निवडणुकांमध्ये भाजपला मराठवाड्यात होऊ शकतो. विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी ज्या मतदार संघात सहभाग घेतल्या त्यापैकी ७० टक्के जागा भाजपने जिंकल्या आहेत. त्यामुळे मराठवाड्यामध्ये पूर्वीप्रमाणे भाजपला पाळेमुळे खोलवर रोवायचे असेल तर पंकजा मुंडे यांना कॅबिनेट मंत्री करून त्यांना ताकद देण्याचे काम करावे लागेल, असे मत राजकीय जाणकारांचे आहे.

शंभू सीमेवर शेतकऱ्यांचा

त्याला रुग्णवाहिकेतून जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. तर एका शेतकऱ्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शेतकऱ्यांना रोखण्यासाठी हरियाणा पोलिसांनी रस्त्यात लोखंडी खिळे लावले आहेत. यावेळी शेतकऱ्यांनी पोलिसांच्या कारवाईचा निषेध करत घोषणा दिल्या. हरियाणाकडून शेतकऱ्यांना सांगण्यात आले आहे की, तुमचे शिष्टमंडळ पाठवा, आम्ही चर्चा करू. तोपर्यंत शेतकऱ्यांना पुढे जाऊ दिले जाणार नाही. पण शेतकरी दिल्लीच्या दिशेने कूच करण्यावर ठाम आहेत. सर्व पिकांना किमान आधारभूत किंमतीची कायदेशीर हमी द्यावी, यासह अन्य मागण्यांसाठी शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. यापूर्वीही शेतकऱ्यांनी १३ फेब्रुवारी आणि २१ फेब्रुवारी रोजी दिल्लीच्या दिशेने कूच करण्याचा प्रयत्न केला होता. पण, त्यांना पंजाब–हरियाणा सीमेवरील शंभू आणि खनौरी येथे सुरक्षा दलांनी रोखले होते. शेतकरी गेल्या ९ महिन्यांपासून संयुक्त किसान मोर्चा (गैर–राजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाच्या बॅनरखाली शंभू आणि खनौरी सीमेवर तळ ठोकून आहेत.

विधानसभेचे विशेष

(१) (कार्यभार) जितेंद्र भोळे यांनी दिली. याच बरोबर महाराष्ट्र विधान परिषदेची बैठक सोमवार, ९ डिसेंबर, २०२४ रोजी दु.४ वा. आयोजित करण्यात आली असल्याचेही विधानमंडळ सचिवालयामार्फत कळविण्यात आले आहे. या विशेष अधिवेशनासाठी भाजपाचे आमदार कालीदास कोळंबकर यांची विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली असून त्यांना राज्यपालांनी शपथ दिली.

कालीदास कोळंबकर विधानसभेचे हंगामी अध्यक्ष

विधानसभेचे जेष्ठ सदस्य कालीदास सुलोचना निळकंठ कोळंबकर यांना शुक्रवारी विधानसभेच्या हंगामी अध्यक्षपदाची शपथ देण्यात आली. राजभवन येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी सोहळ्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी कालीदास कोळंबकर यांना हंगामी अध्यक्ष पदाची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते. राष्ट्रगीत व राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली व राष्ट्रगीताने सांगता झाली.

माजी मंत्री मधुकर

सदस्य होते, परंतु २०१९ मध्ये त्यांनी त्यांचा मुलगा वैभव पिचड यांच्यासह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून देखील काम पाहिले होते.

प्रार्थनास्थळ कायदा १९९१ रद्द करा;

बांधण्यात आले. देशात अशा प्रकारे धार्मिक स्थळांचे वाद निर्माण होऊ नयेत यासाठी १९९१ला प्रार्थनास्थळ कायदा लागू करण्यात आला. यानुसार देशातील धार्मिक स्थळांची स्थिती १५ ऑगस्ट १९४७ला होती, तशी ठेवायची आहे. पण आताही जवळपास डझनभर मंदिर आणि मशिदींचे वाद न्यायालयात सुरु आहेत. तर दुसरीकडे हिंदू पक्षाने प्रार्थनास्थळ कायदा रद्द करण्याची मागणी करणारी याचिका २०२०ला सुप्रिम कोर्टात दाखल केली आहे. या याचिकेवर हस्तक्षेप करणारी याचिका मुस्लिम पक्षाने नुकतीच सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे, असे लाईव्ह लॉ या वेबसाईटने दिलेल्या बातमीत म्हटले आहे.

बाबासाहेबांचे कार्य पुढे घेऊन जाणे

भारतीय संविधानाचा आदर ठेवून डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि कार्य पुढे घेऊन जाणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल, अशा शब्दात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचे स्मरण करुन त्यांना आदरांजली वाहिली. मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात डॉ. बाबासाहेबांचे स्मरण करताना राज्यपाल सी पी राधाकृष्णन पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. ते शिक्षणतज्ञ, कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ञ, लेखक, पत्रकार, साहित्यिक, समाजसुधारक सर्वकाही होते. सामाजिक सुधारणांची दूरदृष्टी असलेले उत्तुंग व्यक्तीमत्व होते. देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय सुधारणांसाठी त्यांनी दिलेले योगदान कायम लक्षात राहील. डॉ. बाबासाहेबांचे कार्य, विचार, आदर्श नवीन पिढीपर्यंत पोहचवण्याचा निर्धार करुया, असे आवाहनही राज्यपालांनी यावेळी केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, राजकुमार बडोले, मंगलप्रभात लोढा, दीपक केसरकर, संजय बनसोडे, कालिदास कोळंबकर, अमोल मिटकरी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, माजी खासदार सर्वश्री नरेंद्र जाधव, राहुल शेवाळे, अमर साबळे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त डॉ अश्विनी जोशी, कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदींसह समाजाच्या सर्वक्षेत्रातील मान्यवर तसेच डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शरद पवार उद्या

केली होती. मात्र, पोलीस प्रशासनाने गावात जमावबंदी आदेश लागू करत ही मतदान प्रक्रिया थांबवली होती. त्यामुळे ग्रामस्थांना बॅलेट पेपरवरील इच्छा मतदान घेताच आले नाही. मात्र, या गावची सध्या जोरदार चर्चा होत आहे. मारकडवाडी या ठिकाणी होणारी मतदान प्रक्रिया ही बेकायदेशी असल्याचे प्रशासनाने म्हटले होते. तसेच या ठिकाणी जमावबंदीचे आदेश देखील लागू करण्यात आले होते. त्यामुळे मतदानाची प्रक्रिया रद्द करण्यात आली होती.

नदी जोड प्रकल्पावर अधिक

‘विरोधक माशी शिंकली तरी मला दोष द्यायचे. पण मी त्यांचा आभारी आहे. कारण त्यांच्या टीकांमुळे मला लढण्याचे बळ मिळाले. सातत्याने विरोधक माझ्यावर टीका करत राहिले, परिणामी जनतेनेच कोण चांगले आहे याचा निकाल लावला,’ असा टोलाही मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना लगावला

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ०७ डिसेंबर २०२४

भारतीय संविधान समाज परिवर्तनाचे शस्त्र - बालासाहेब मसने

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील श्री. योगेश्वरी नूतन विद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेतील सहशिक्षक तथा इंग्रजी विषय विभाग प्रमुख श्री बालासाहेब मसने सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक क्रांतीपट उलगडून दाखवला.

प्राचीन कालखंडापासून मानवी समाज हा सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय संघर्षाचा राहिलेला आहे. जात, वर्ण, पंथ, धर्म असे मानवनिर्मित वेगवेगळे भेद माणसाला माणसापासून दूर करत आलेले आहेत. आधुनिक कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्वच समाज घटकांना समतेचा मार्ग आणि सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत असे विचार श्री. बालासाहेब मसने यांनी आपल्या व्याख्यानात मांडले.

याप्रसंगी विचार मंचावर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ अपर्णा पाठक मॅडम, उपमुख्याध्यापक श्री विलास गायकवाड सर, पर्यवेक्षक श्री. आर. एस. मठपती सर, श्री व्ही व्ही कुलकर्णी सर, व सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.बी.आर.मसने सर हे उपस्थित होते.

अंबाजोगाईकरांनो गावचे साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी सहकार्य करा

ज्येष्ठ पत्रकार, लेखक अमर हबीब यांचे नम्रतापूर्वक आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

१४ आणि १५ डिसेंबर रोजी ११ वे आंबाजोगाई साहित्य संमेलन आद्यकवी मुकुंदराज सभागृहात होत आहे. हे तुम्हाला माहीत आहे.

तुम्हाला हेही माहीत आहे की, हे संमेलन लोकाश्रयी आहे. २०० रुपये भरून जे लोक स्वागत सभासद होतात, त्यांच्या पैश्यातून हे संमेलन घेतले जाते. आपल्या गावात असे अनेक धनवान लोक आहेत, जे असे संमेलन चुटकी सरशी घेऊ शकतात. त्यांच्या पुढे हात पसरला तर ते नाही म्हणणार नाहीत. पण साहित्याचे संमेलन घ्यायचे तर ते स्वाभिमानाने घ्यावे, कोणापुढे हात पसरू नये हा आमचा ठाम निर्धार आहे.

संमेलन हा एक इव्हेंट नाही, साहित्याची मूव्हमेंट आहे. ती जिवंत राहायची असेल तर ती लोकाश्रयानेच चालली पाहिजे. मला तुमच्या पुढे हात पसरण्यात अजिबात संकोच वाटत नाही. मात्र धनवानांपुढे हात पसरण्याची माझ्यावर वेळ येऊ नये असे मला मनापासून वाटते. दुर्दैवाने तशी वेळ आली तर मी हे काम सोडून देणे पसंत करेन!

अंबाजोगाईची लोक संख्या आज लाखाच्या वर आहे. ३० ते ४० हजार कुटुंबे या गावात राहतात. त्यातली १० हजार कुटुंबे पैसे देऊ शकत नाहीत म्हणून सोडून दिली तरी २० ते ३० हजार कुटुंबे मध्यमवर्गीय आहेत. साहित्य चळवळीला दोन वर्षातून

एकदा दोन शे रुपये देणे त्यांना जड नाही. सगळे देणार नाहीत हेही मी समजू शकतो. गावात किमान दोन हजार लोक स्वइच्छेने प्रत्येकी २०० रुपये देणारे निघायला काय हरकत आहे?

शानदार साहित्य संमेलन साजरे करायला खूप खर्च लागतो. परंतु साधे आणि सुंदर संमेलन करायला अंबाजोगाईत किमान दोन लाख रुपये लागतात. ते तुमच्या सहकार्याशिवाय कसे गोळा होणार?

विनंती

तुम्ही अगोदर स्वागत सभासद झाला असाल तर नवे ५ सभासद करावे. म्हणजे हजार रुपयांचे योगदान तुमच्या मार्फत व्हावे.

तुम्ही एव्हाना स्वागत सभासद झाला नसाल तर तात्काळ २०० रुपये भरून सभासद व्हावे.

पैसे कोठे पाठवाल?

गोरख शेंद्रे (सचिव) यांच्या ९४२१४ ४३३९१ या क्रमांकावर पाठवा. पाठवल्यानंतर त्यांना पैसे पाठवल्याचा फोन करा किंवा मॅसेज करा. ते व्हाट्सएप वर पावती पाठवून देतील.

फलक लावणार

या संमेलनाच्या सर्व स्वागत सभासदांच्या नावाची यादी संमेलन स्थळी एका फलकावर आपण लावणार आहोत. त्यावर गुंचे नाव असणे म्हणजे तुम्ही या गावातील संस्कृती संवर्धनात योगदान दिले आहे. या गावातील साहित्य चळवळीला बळ दिले आहे. या गावात स्नेह सदभाव रहावा यासाठी तुम्ही सजग आहात! असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार लेखक व संवेदनशील विचारवंत अमर हबीब यांनी केले आहे.

महाराणी ताराबाई विद्यालयामध्ये विविध उपक्रम घेऊन एड्स पंधरवडा साजरा

वडवणी । प्रतिनिधी

जागतिक एड्स पंधरवाड्या निमित्त चिंचवण येथील ग्रामीण रुग्णालयाच्या आयसीटीसी विभागाच्या वतीने वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये इयत्ता- ९ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा व व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्याच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन करून शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले या प्रसंगी ग्रामीण रुग्णालय चिंचवण येथील आयसीटीसी विभागातील समुपदेशक श्री प्रसाद ठोसर तसेच विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के ए.आर.,लॅब टेक्निशियन श्रीमती बावरे मॅडम ,श्रीमती शोभाताई आंधळे,प्रा.उघडे मडम,प्रा.मुंडे सी.व्ही.,प्रा.संजय केदार उपस्थित होते.

या रांगोळी स्पर्धेमध्ये कु.श्रद्धा गणेश माळवदे इयत्ता १२वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनीचा प्रथम क्रमांक आला तर द्वितीय क्रमांक कु.प्रेरणा महारुद्र केकाण १२वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनीचा तर इयत्ता- ९ वीची विद्यार्थिनी कु.भाग्यश्री पांडुरंग गायकवाड हिचा तृतीय क्रमांकाला तसेच विद्यार्थ्यांमध्ये एड्स संदर्भात जनजागृती करण्यासाठी मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष कार्यक्रम अधिकारी जिल्हा रुग्णालय बीड येथील डॉ.सुहास कुलकर्णी सर यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला त्यांनी विद्यार्थ्यांना एड्सच्या संदर्भात सखोल मार्गदर्शन व समुपदेशन केले त्यांच्यासोबत समुपदेशक प्रसाद ठोसर सर तसेच सुपरवायझर लिंक वर्कर वाल्मीक पाईक,लिंक वर्कर अश्विनीकुमार डावरे उपस्थित होते.

व्याख्यानेच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक समुपदेशक प्रसाद ठोसर सर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.अंडील सर यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार उपपराचार्य मस्के सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दासखेड येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

दासखेड । प्रतिनिधी

विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र दासखेड कार्यालयात अभिवादन करण्यात आले यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ .शरयू पडोळे. सय्यद कादर. गणेश मस्के. नितेशकुमार राख. चव्हाण राहुल. प्रदीप गोरे . अश्विनी सोनवणे .गणेश सरडे .सह उपस्थीत होते.

जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्सवात संपन्न

जालना । प्रतिनिधी

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व युवा कार्यक्रम मंत्रालय भारत सरकार अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४-२५ उत्सवात संपन्न झाला.

येथील शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सूर्यवंशी, शाहीर रामानंद उगले , जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर प्राचार्य आयटीआय कॉलेज प्राध्यापक डॉ. प्रवीण उखळीकर जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना प्राध्यापक डॉ. सोमीनाथ खाडे क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेशी ,श्रीमती आरती चिल्लारे, क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, राहुल गायके आदी उपस्थित होते. या जिल्हास्तरीय महोत्सवांमध्ये समूह लोकनृत्य ,समूह लोकगीत, कविता लेखन, कथालेखन ,वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नव संकल्पना व युथ आयकॉन इत्यादी बाब असून विजयी स्पर्धकांना रोख पारितोषिक प्रमाणपत्र व ट्रॉफी असून यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक काढले आहे.कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व स्पर्धकांनी कलाक्षेत्रात आपले नाव उज्वल करावे अशा प्रकारच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे व जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी केले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन मिलन सावंत यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉक्टर रेखा परदेशी यांनी केले.

मूकबधिर शाळा नेकनूर येथे महापरिनिर्वाण दिन

नेकनूर । प्रतिनिधी

येथील मूकबधिर शाळेत ६ डिसेंबर वार शुक्रवार रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी अध्यक्ष म्हणून मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक श्री लुचारे सर व प्रमुख पाहुणे श्री राखुंडे सर उपस्थित होते. प्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य दीन दुबळ्या वंचित समाजासाठी व देशाच्या क्रांतीसाठी अर्पण केले. त्यांनी तयार केलेल्या संविधनामुळे आज आपण सुखी आणि

सुरक्षित जीवन जगत आहोत. आज आपला संपूर्ण भारत देश हा त्यांनी आखून दिलेल्या कायद्याच्या आधारावर म्हणजे संविधानावर चालतो आहे. आणि हे सर्व करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तिथपर्यंत पोहोचण्यासाठी संघर्ष ही तितकाच करावा लागला आहे. पण त्यांनी केलेल्या त्यागाची व संघर्षाची आपल्यालाही जाणीव असणे आवश्यक आहे. असे वक्तव्य श्रीमती खराटे मॅडम यांनी आपल्या मनोगत मधून व्यक्त केले आणि त्यानी व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजून सांगितले. प्रस्ताविक श्री गिराम सर यांनी केले ,.सूत्रसंचालन श्रीमती खरंगुळे मॅडम यांनी केले, कार्यक्रमाचे आभार श्री कुलकर्णी सर यांनी मानले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या साह्याने हा महापरिनिर्वाण दिन मूकबधिर शाळेत उत्साहात संपन्न झाला.

देश का प्रकृती परीक्षण अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे - डॉ.विजय कट्टे

माजलगाव (प्रतिनिधी) भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग दिल्ली व आयुष मंत्रालय भारत सरकार यांच्या आदेशानुसार देश का प्रकृती परीक्षण अभियान दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ ते २५ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये राबवण्यात येत आहे या अभियानांतर्गत प.पु.गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे कॉलेज माजलगाव येथील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ०६ डिसेंबर शुक्रवार रोजी ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे भेट देऊन रुग्ण तसेच इतर व्यक्तीची प्रकृती परीक्षण केले रुग्णालय अधीक्षक डॉ.विजय कट्टे यांनी प्रकृती परीक्षण करून या अभियानाची सुरुवात केली लोकांच्या

प्रकृतीनुसार त्यांच्या शरीरासाठी आवश्यक अशी दिनचर्या व आरोग्य सल्ले लोकांना या अभियानाद्वारे माहित होणार असल्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी प्रकृती परीक्षण करून घ्यावे व आरोग्या विषयी जनजागृती व्हावी यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.विजय कट्टे यांनी केले यावेळी डॉ. रुद्रावर साहेब महाविद्यालयाचे डॉ.चव्हाण डॉ.लुगडे उपस्थित होते.

चिंचोटी येथे नैसर्गिक सेंद्रीय शेतीचे प्रशिक्षण संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

जागतिक मृदा दिनानिमित्त चिंचोटी येथे डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजने अंतर्गत सेंद्रिय गटाचे गावपातळीवर प्रशिक्षण घेण्यात आले.या प्रशिक्षणास मार्गदर्शन करण्यासाठी माजलगाव उपविभागीय कृषी अधिकारी श्रद्धा भवारी मॅडम, कृषी विकास अधिकारी श्री साहिल सय्यद सर, जिल्हा मृद चाचणी प्रयोगशाळा प्रमुख श्री सहदेव पाटील उपस्थीत होते.उपस्थीत मान्यवरांच्या शुभ हस्ते दशपर्णीअर्क जिवअमृत तयार करण्यासाठी २०० लिटरच्या बॅलरचे शेतकर वाऱ्यांना वाटप करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की ५ डिसेंबर हा मृदा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो.त्या निमीत्ताने वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे नैसर्गीक सेंद्रीय शेतीचे प्रशिक्षणात शेंद्रीय शेती विषयी शेतकर्यांना माजलगाव कृषी विभाग ऊप विभागीय अधिकारी श्रद्धा भवारी मॅडम या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणुन लाभल्या होत्या त्यांच्या समवेत कृषी विकास आधीकारी साईल सय्यद,मृद शाळा प्रमुख सहदेव पाटील ता कृ अ भुजंगराव खेडकर,कृ प ठोंबरे साहेब,कृ प वेक्षक जाधवर,आत्माचे ए टी एम सुदर्शन आंधळे अर्दी मान्यवरांनी शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन

जिवअमृत तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना बॅलरचे वाटप

केले.या वेळी शेंद्रीय शेती करण्यास शेतकऱ्यांना दशपर्णीअर्क व जीवअमृत तयार करण्यासाठी २०० लिटरच्या बॅलरचे वाटप करण्यात आले.

यावेळी श्रद्धा भवारी मॅडम आपल्या भाषणात म्हणाल्या की सध्याच्या रासानिक खतांच्या,किरनाशकांचा जास्त वापरा मुळे मानवी जिवनावर मोठा परीणाम होत आहे.यामधून कॅन्सर सारख्या भयानक आजाराला सामोर्य जावे लागत आहे.यावर एकच उपाय म्हणजे आपल्याला सेंद्रीय शेती करणे.पुर्वी सारखे गावरान खाद्य शेतीत पिकवणे काळाची गरज आहे.यामध्ये आपण घरच्या घरी कमी खर्चात सेंद्रीय शेती करण्यासाठी शेन खत,कंपोस्ट खत,गांडुळ खत,गोमुत्र,दसपर्नी अर्क,डि कंपोज,जिव अमृत यासारखी शेतीसाठी लागणारे घटक आपण तयार करु शकतो.या दिलेल्या बॅलर मध्ये पाणी न साठवता दशपर्णी अर्क व जीवामृत तयार करावे असे यावेळी त्यांनी सांगितले.या कार्यक्रमासाठी, मंडळ कृषी अधिकारी टोम्पे साहेब, कृषी पर्यवेक्षक खराडे साहेब,आत्माचे ए टी एम सुदर्शन आंधळे,कृषी सहाय्यक कोठुळे साहेब कृ सा भुजबळ साहेब,कृ सा तिडके साहेब,कृ प इंगळे साहेब,कृ प तारकर,पशुवैद्यकिय अधीकारी तांदळे साहेब,ग्राम विकास अधिकारी सत्यवान कशिद,सरपंच भागवत गोंडे,विधाका शेतकरी कंपनीचे अध्यक्ष धनपाल काका गोंडे यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.कार्यक्रमचे सुत्र संचलन ठोंबरे साहेब यांनी केले तर उपस्थीत मान्यवर व शेतकरी बांधवांचे आभार सुमंत (मुन्ना) गोंडे यांनी मानले.

पान ६ वरून...

सुरेश धस यांना कॅबिनेट

त्यांची इच्छा आहे. आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांचे बरेचसे फायद्याचे काम केलेले आहेत. त्यांनी एक शब्द दिला होता एक बी डुक्कर शिल्लक ठेवणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या असून कोणतच डुक्कर दिसणार नाही अशी अपेक्षा सामान्य नागरिक करत आहेत. जनतेचा मनातला आमदार निवडून आल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होतच आहे परंतु त्यांना कॅबिनेट मंत्रीपद समाविष्ट करावे ही सुद्धा सर्व सामान्यांची इच्छा आहे.

अंबाजोगाई साहित्य संमेलनात

संमेलनाच्या उद्घाटनापुर्वी

काढण्यात येणा-या जागर दिंडीत शहरातील ज्येष्ठ नागरीकांचा सन्मान केला जाणार आहे. ही दिंडी छत्रपती शिवाजी महाराज चौक इथून निघेल व ३:३० च्या आस पास आद्यकवी मुकुंदराज सभागृहाच्या प्रवेश द्वाराला पोहचेल.

तेथे अमोरा-समोरच्या दोन रांगेत जेष्ठ नागरिक उभे असतील. दिंडीतील मुले जेष्ठ नागरिकांना एक एक फूल देतील. त्यानंतर ज्या मुलाने ज्या ज्येष्ठ नागरिकाला फूल दिले आहे, त्या मुलांसोबत त्या ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने सभागृहात नेले जाईल, तो मुलगा त्यांना सन्मानाने स्थानापन्न करेल. जेष्ठांना काही लागले तर तोच विद्यार्थी मदत करेल. मुलांमध्ये जेष्ठांबद्दल सन्मानाचा संस्कार रुजावा. त्यांच्यासाठी ही जन्माची आठवण व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे.

जेष्ठ नागरिकांच्या सहकार्या शिवाय हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकत नाही. यासाठी शहरातील सर्वांना ज्येष्ठ नागरिकांना साहित्य संमेलनाच्या संयोजकांच्या वतीने विनंती करण्यात येते की, आपण सर्व जेष्ठ नागरिकांनी १४ डिसेंबर रोजी दुपारी ३:३० वाजता मुकुंदराज सभागृह परिसरात उपस्थित रहावे. त्यांनी मुलांनी दिलेल्या फुलांचा स्वीकार करावा. मुलाच्या सोबत सभागृहात जावे. स्थानापन्न व्हावे. आपण सर्वांनी या आगळ्या वेगळ्या उपक्रमात सहभागी व्हावे असे नम्र आवाहन ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

सुरेश आण्णांना कॅबिनेट मंत्री

मतदार संघाचे प्रश्न मांडले आहेत.कोरोनाच्या महामारीत देखील महाराष्ट्रात सर्वात अधिकचे कोविड सेंटर त्यांनी उभारून नागरिकांचे प्राण वाचवले आहेत. महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्रीपद देखील भुषविले आहे. त्यांच्या अनुभवाचा योग्य तो सन्मान करून त्यांना कॅबिनेट मंत्री पद द्यावे त्यांच्या अनुभवाचा आष्टी विधानसभा मतदारसंघात सह संपूर्ण महाराष्ट्राला फायदा होईल गोरगरीब कष्टकरी यांच्या न्यायासाठी आमदार सुरेश धस कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे असल्याचे उपसरपंच बंडू सोले यांनी सांगितले.

समाज बांधवांनी घटना व

पाहिजे तसेच आपण राज्यघटनेचे व कायद्याचे पालन करुन जिवन जगणे हीच खरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आज च्या दिनी खरी आदरांजली असेल असे प्रतिपादन पोनि राहुल सुर्यतळ यांनी केले या वेळी मकसरे मॅडम, यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर जि.एन.घनघाव सर यांनी शौक गीत गायले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष भालेराव सर यांनी केले तर सुत्रसंचलन दशरथ मकसरे यांनी केले आभार प्रदर्शन शिनगारे सर यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी पत्रकार रविकांत उघडे,बळीबा चांदमारे सर,सोपान उजगरे, यादी परिश्रम घेतले कार्यक्रमाला बहुसंख्येने बौध्द उपासक, उपासींका उपस्थित होत्या.

मारहाणप्रकरणी महानगरपालिकाचे

असता कुठलिच कारवाई झाली नाही. त्यामुळे श्री. निर्मळ यांनी दि. १२ जुन २०२४ रोजी ॲड. विजय कदम यांच्यामार्फत न्यायालयात धाव घेतली असता न्यायालयाने स्वच्छता निरीक्षक श्री. गावंडे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार दि. २ डिसेंबर रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात भादंवि कलम १६६, ३२३, ५०३, ५०४ आणि ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास फौजदार रामकिशन वाघमारे हे करीत आहेत.

साडेतीन वर्षांच्या सानवीने

साठे हे किती जनसामान्यांच्या हृदयापर्यंत पोचले असल्याचे स्पष्ट दिसून आले. एक सर्वसाधारण, साधा व सरळ माणूस कसा असतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे पृथ्वीराज साठे हे आहेत यावरून हे लक्षात आले. हार जित या गोष्टी अत्यंत गौण असून माणूस व माणुसकी हे सर्वश्रेष्ठ असल्याचे पृथ्वीराज साठे यांनी गावकऱ्यांना सांगताच समस्त गावकरी देखील साठे यांच्यासमोर नतमस्तक झाले.

दरवर्षीपेक्षा राज्यात यंदा कमी प्रमाणात थंडी

शेतकऱ्यांनाही सतर्कतेचा इशारा, काय म्हणाले हवामान शास्त्रज्ञ?

राज्याच्या विविध भागात पावसानं एकच धुमाकूळ घातला आहे. अचानक आलेल्या या पावसामुळं शेतकरी चिंतेत आहेत. या पावसाचा फळपिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर नव्याने स्थापन झालेल्या फडणवीस सरकार समोर अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच झालेल्या नुकसानचे आव्हान आहे. नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून नुकसानभरपाईची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. तर आगामी काळातही सतर्क राहण्याचे आदेश भारतीय हवामान विभागानं राज्यातील काही जिल्ह्यांना दिले आहे. अशातच या बाबत हवामान शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी यावर भाष्य करताना राज्यात पडत असेला पाऊस अवकाळी नसल्याचे म्हटले आहे. पेंगल समुद्री वादळामुळे बाष्पयुक्त वारे पश्चिम महाराष्ट्राकडे वळल्याने काही भागात पाऊस पडतोय. मात्र या पावसाला अवकाळी पाऊस म्हणता येणार नसल्याचे ते म्हणाले.

यंदाच्या हंगामात राज्यभरात कमी प्रमाणात थंडी : काही दिवसांपूर्वी पुण्यावर शितवाऱ्यांचा प्रभाव होता, त्यामुळे पुण्यात थंडी वाढली होती. मात्र पेंगल या समुद्री वादळामुळे तापमानात वाढ झाली आहे. पुण्यातच नाही तर राज्यभरात यंदाच्या हंगामात थंडी कमी प्रमाणात असणार आहे. विंटर

आऊट लुकमध्ये यंदा तीन महिने तापमानात चढ-उतार बघायला मिळणार आहे. साधारण १४ ते १७ अंशापर्यंत तापमान असू शकत. असा अंदाज ही हवामान शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी व्यक्त केला आहे.

तर शेतकऱ्यांच्या पिकांवर परिणाम

पुढील तीन दिवस पुण्यात तापमानात काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र त्यानंतरचे तीन दिवस पुण्यात शितवाऱ्याचा प्रभाव जाणवणार आहे आणि थंडीत वाढ होणार आहे. पण दरवर्षीपेक्षा यंदा थंडी कमी प्रमाणात असणार आहे. नेहमीच्या वातावरणापेक्षा काही प्रमाणात वातावरणात बदल झाला तर शेतकऱ्यांच्या पिकांवर परिणाम दिसू लागतो. यंदा देखील या पेंगलमुळे पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचं काही प्रमाणात नुकसान होऊ शकत. असा इशाराही एस डी सानप यांनी दिल आहे.

लातूर जिल्ह्यातील अनेक भागात पावसाची हजेरी : लातूर जिल्ह्यातील अनेक भागात काल(गुरुवारी) मध्यरात्रीपासून पावसाने हजेरी लावली आहे. परिणामी वातावरणात गारठा वाढला आहे. लातूर शहर आणि परिसर देवणी शहर आणि परिसर निलंगा तालुक्यातील काही भाग या ठिकाणी पावसाची जोरदार हजेरी आहे. लातूर शहरासह जिल्ह्यातील देवणी निलंगा तालुक्यातील काही भागांमध्ये मध्यरात्री अचानक पावसाने हजेरी लावली. मध्यरात्री अचानक आलेल्या पावसामुळे बाहेर असलेल्या लोकांची तारांबळ उडाली. मध्यरात्री अचानक लातूर जिल्ह्यातील लातूर शहर आणि परिसर देवणी परिसर त्याचबरोबर निलंगा तालुक्यातील खरोसा भाग या ठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लावली होती. कव्हा, हरंगुळ, खोपेगाव, सारोळा, बाभळगाव या भागातही रिमझिम पावसाची हजेरी होती. अचानक झालेल्या पावसामुळे वातावरणात प्रचंड गारठा वाढला आहे. या पावसामुळे पिकावर रोगराई पडण्याची शक्यता दाट झाली आहे. मागील काही दिवसापासून वातावरणात म्हणावा तसा गारवा जाणवत नव्हता. मात्र मध्यरात्री झालेल्या पावसामुळे वातावरणात गारठा वाढला आहे.

भारत सरकारतर्फे २,४८१ कोटी रुपयाच्या नैसर्गिक शेती राष्ट्रीय अभियानास सुरुवात

दिल्ली : नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी भारत सरकारने १० दशलक्ष शेतकऱ्यांमध्ये रूपये २,४८१ कोटींचे राष्ट्रीय अभियान सुरू केले आहे. या उपक्रमाचा उद्देश मातीची गुणवत्ता सुधारणे आणि पारंपरिक शेती आणि पशुधन यांच्या एकात्मिक पद्धतींद्वारे रासायनिक मुक्त अन्न प्रदान करणे हे आहे. या प्रोग्राममध्ये सर्टीफिकेशनची सोपी पद्धती, ब्रँडिंग आणि ऑनलाइन देखरेख यांचा समावेश असेल.

सरकारने देशभरातील १० दशलक्ष शेतकऱ्यांमध्ये नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी २,४८१ कोटीच्या बजेट खर्चासह राष्ट्रीय मिशन जाहीर केले. शाश्वत शेतीसाठी एक मजबूत व्यवस्था निर्माण करणे हा मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा उद्देश आहे. १५ व्या वित्त आयोगापर्यंत (२०२५-२६) भारत सरकारचा हिस्सा १,५८४ कोटी आणि राज्यांचा ८९७ कोटी असेल. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले, ''मातीचा दर्जा सुधारण्याची आणि रासायनिक मुक्त अन्नाद्वारे लोकांचे आरोग्य राखण्याची गरज आहे. नैसर्गिक शेतीसाठी राष्ट्रीय अभियान हा एक महत्वाचा निर्णय आहे'', असेही त्यांनी सांगितले.

या योजनेनुसार शेतकऱ्यांना त्यांच्या नैसर्गिक शेती उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी एक सोपी प्रमाणपत्र प्रणाली आणि समर्पित कॉमन ब्रँडिंग प्रदान केले जाईल. अंमलबजावणीसाठी रिअल-टाइम जिओ-टॅग केलेले आणि संदर्भित मॉनिटरिंग ऑनलाइन पोर्टलद्वारे केले जाईल. पूर्वजांकडून मिळालेल्या पारंपारिक ज्ञानात रुजलेले, शेतकरी नैसर्गिक शेतीचा सराव करतील ज्यामध्ये स्थानिक पशुधन एकात्मिक नैसर्गिक शेती पद्धती, वैविध्यपूर्ण पीक प्रणाली इत्यादींचा समावेश आहे, असेही सरकारने एका निवेदनात म्हटले आहे.

उसाला प्रतिटन ३७०० भाव न दिल्यास हंगाम रोखणार

स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक, आठ दिवसांची दिली मुदत

कोल्हापूर : यंदाच्या गळीत हंगामाची पहिली उचल ३७०० रुपये प्रतिटन जाहीर करावी, अन्यथा हंगाम रोखण्याचा इशारा, स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या सावकर गटाने दिला आहे. प्रभारी जिल्हाधिकारी, अपर जिल्हा पोलिस प्रमुख आणि साखर सहसंचालकांना बैठकीत गटाने हा इशारा दिला आहे. आठ दिवसांत या मागणीबाबत कार्यवाही न केल्यास होणाऱ्या आंदोलनास प्रशासन जबाबदार असल्याचा इशाराही 'स्वाभिमानी'चे नेते सावकर मादनाईक यांनी दिला आहे.

मादनाईक म्हणाले, ''गेल्या वर्षी शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी, साखर कारखान्याचे विश्वस्त, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस प्रमुख, साखर सहसंचालक यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात ऊस दराची बैठक होऊन पहिल्या उचलेचा निर्णय होत होता. या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुका आणि हेतु पुरस्सर कारखानदारांनी लांबवलेल्या गळीत हंगामामुळे पहिल्या उचलीचा निर्णय न होताच साखर हंगाम सुरू झाला आहे. अशा स्थितीत ऊसतोड बंद आंदोलन करणे शेतकरी व कारखानदारांच्या हिताची गोष्ट नाही, हे जाणून आम्ही ऊसतोड व रस्त्यावरील आंदोलन केलेले नाही.'' अपर जिल्हाधिकारी, अपर पोलिस अधीक्षक, साखर सहसंचालक यांना दिलेल्या निवेदनावर जालिंदर पाटील, मिलिंद साखरपे, जनार्दन पाटील, वैभव कांबळे, शैलेश आडके, सागर मदनाईक, सतीश हेगाण्णा यांच्या सह्या आहेत.

ड्रोनद्वारे बुरशीनाशके किंवा कीटकनाशकांची फवारणी करताना ही खबरदारी घ्या!

कृषी क्षेत्रात ड्रोनचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. भारत सरकारही ड्रोनच्या वापराला चालना देण्यासाठी विविध सुविधा पुरवत आहे. फळझाडे आणि ऊस यांसारख्या पिकांमध्ये त्याचा वापर फायदेशीर ठरत असून शेतकरी त्याकडे आकर्षित होत आहेत.

देशभरातील विविध कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे आणि प्रगतीशील शेतकरी ड्रोनचा वापर करत आहेत. लहान-मोठे शेतकरी याच्या वापराकडे आकर्षित होत आहेत. ड्रोनद्वारे बुरशीनाशके किंवा कीटकनाशकांची फवारणी करताना, सुरक्षितता, परिणामकारकता आणि पर्यावरणीय जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी अनेक खबरदारी घ्यावी लागते.

सुरक्षा उपाय :ड्रोनद्वारे फवारणी करण्यापूर्वी किंवा दरम्यान, ऑपरेटर आणि आसपासच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांनी रसायनांशी संपर्क टाळण्यासाठी हातमोजे, मास्क आणि गॉगलसह योग्य संरक्षणात्मक उपाय केले आहेत याची खात्री करा.

हवामान परिस्थिती : ड्रोन उडवताना हवामान योग्य असल्याची खात्री करा. वारा वाहत असताना किंवा पावसात ड्रोन उडवणे टाळा वाहत्या वाऱ्यामुळे किंवा पाऊस यामुळे बुरशीनाशक उडून किंवा धुवून जाते त्यामुळे योग्य ती परिणामकारकता साधता येत नाही.

फवारणीपूर्वी ड्रोन चाचणी : ड्रोनच्या फवारणी उपकरणाची चाचणी घ्या आणि ते बुरशीनाशकाचे

समान आणि अचूक वितरण करत असल्याची खात्री करा.

नो-फ्लाय झोन : तुमच्या क्षेत्रातील कोणत्याही नो-फ्लाय झोन किंवा एअरस्पेस निर्बंधांची जाणीव ठेवा आणि त्यांचे पालन करा.

बफर झोन : जलकुंभ, निवासी क्षेत्रे आणि वन्यजीव अधिवास यांसारख्या संवेदनशील क्षेत्रांभोवती बफर झोन स्थापित करा आणि तेथे फवारणी करू नका.

कृषी रसायनांची अचूक मात्रा घ्या : शेताचा आकार आणि विशिष्ट पिकाच्या गरजेनुसार बुरशीनाशकाच्या आवश्यक डोसची अचूक मात्रा घ्या.

ड्रोन उडवताना उंची : अडथळे टाळून आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी व समान कव्हरेज सुनिश्चित करण्यासाठी योग्य उंचीवर ड्रोन उडवा.

प्रवाह व्यवस्थापन : ड्रोनमधून स्प्रे योग्य होत असल्याची खात्री करा. स्प्रे नोजल, फ्लाइटची उंची आणि वेग कमी करण्यासाठी ॲडजस्ट करा.

रेकॉर्ड ठेवणे : अर्जाच्या तपशीलवार नोंदी ठेवा, ज्यामध्ये तारीख, वेळ, हवामानाची परिस्थिती, वापरलेले बुरशीनाशक आणि आलेल्या कोणत्याही समस्या नमूद करा.

आपत्कालीन उपाय : अपघात किंवा गळती झाल्यास आपत्कालीन उपाय तयार ठेवा. यामध्ये प्रथमोपचार पुरवठा, प्रतिबंधात्मक साहित्य आणि घटनांची तक्रार करण्यासाठी संपर्क क्रमांक असावेत.

पोस्ट अर्ज तपासणी : फवारणी केल्यानंतर, ड्रोन आणि उपकरणे तपासा जेणेकरून कोणतीही गळती किंवा नुकसान होणार नाही. अन्यथा पुढील शेतातील फवारणी दूषित होऊ शकते.

ऑपरेटर प्रशिक्षण : ड्रोन आणि बुरशीनाशक दोन्ही हाताळण्यासाठी ऑपरेटर योग्यरित्या प्रशिक्षित असल्याची खात्री करा. त्यांना संभाव्य धोके आणि ते कसे कमी करावे याची माहिती असणे गरजेचे आहे.पर्यावरणीय प्रभाव : बुरशीनाशक वापराचे संभाव्य पर्यावरणीय परिणाम आणि दीर्घकालीन परिणाम विचारात घ्या. जेव्हा शक्य असेल तेव्हा पर्यावरणास अनुकूल बुरशीनाशकांची निवड करा.

स्थानिक नियम आणि नियमांचे पालन करा : कीटकनाशकांच्या वापरासंबंधी सर्व स्थानिक, राज्य आणि फेडरल नियमांचे पालन करा. यामध्ये आवश्यक परवानग्या किंवा परवाने मिळवणे समाविष्ट असू शकते.

आजूबाजूच्या नागरिकात जागरूकता निर्माण करा :चिंता कमी करण्यासाठी जवळच्या रहिवाशांना आणि शेजाऱ्यांना ड्रोन फवारणी कार्यक्रमाबद्दल माहिती द्या आणि त्यांना आवश्यक असल्यास खबरदारी घेण्याची संधी द्या. वरील सावधगिरींचे पालन करून, तुम्ही सुरक्षितपणे आणि प्रभावीपणे ड्रोन-आधारित बुरशीनाशक फवारणी करू शकता, ज्यामुळे मानवी आरोग्य आणि पर्यावरण या दोघांनाही धोका कमी होतो.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

- १८२५ : बाष्पशक्तीवर चालणारे 'एंटरप्राईज' नावाचे जहाज कोलकाता बंदरात दाखल झाले. भारतात आलेले अशा प्रकारचे ते पहिले जहाज होते.
- १८५६ : भारतातील पहिला उच्चवर्णीय विधवा विवाह कोलकत्त्यात संपन्न झाला.
- १९१७ : पहिले महायुद्ध - अमेरिकेने ऑस्ट्रिया/हंगेरी विरुद्ध युद्ध पुकारले.
- १९३५ : 'प्रभात'चा धर्मात्मा हा अस्पृष्योद्धारावरचा चित्रपटमुंबईतील 'कृष्ण' सिनेमात प्रदर्शित झाला. हा चित्रपट 'प्रभात' व बालगंधर्व यांनी 'बालगंधर्व-प्रभात' या संयुक्त बॅनरखाली बनवला होता.
- १९४१ : द्वितीय विश्वयुद्धाच्या दरम्यान जपान ने अमेरिकेच्या पर्ल हार्बर वर हवाई हमाला केला होता.
- १९४१ : दुसरे महायुद्ध - जपानने पर्ल हार्बरवर तुफानी हल्ला केला.
- १९४४ : निकोलै रेडेस्कु ने रोमानिया मध्ये सरकार स्थापन केले होते.
- १९४९ : भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली.
- १९७२ : अमेरिकेने चंद्रावर जाणाऱ्या अपोलो १७ चे आजच्या दिवशीच प्रक्षेपण केले होते.
- १९७५ : इंडोनेशियाने पूर्व तिमोरवर हल्ला केला.
- १९८८ : यासर अराफात यांनी इस्त्राएलच्या अस्तित्त्वास मान्यता दिली.
- १९९२ : दक्षिण आफ्रिकेला पहिल्यांदा एकदिवसीय क्रिकेट सामना खेळल्या गेला.
- १९९४ : कन्नड साहित्यिक यू. आर. अनंतमूर्ती यांना ज्ञानपीठ पारितोषिक जाहीर
- १९९५ : फ्रेन्च गयानातील कोऊरू प्रक्षेपण केन्द्रावरुन 'इन्सॅट-२सी' या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण
- १९९५ : अमेरिकेच्या नासाने गुरु ग्रहावर पाठविलेले गॅलीलियो स्पेस एअर क्राफ्ट गुरु वर पोहचले होते.
- १९९८ : ७२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी वसंत बापट यांची निवड
- २००१ : विक्रमसिंघे श्रीलंकाचे नवीन प्रधानमंत्री म्हणून नियुक्त.
- २००२ : तुर्किश अभिनेत्री अजरा अकिन यांना मिस वर्ल्ड चा पुरस्कार.
- २००३ : रमन सिंग हे छत्तीसगड चे मुख्यमंत्री बनले.
- २००४ : हामिद करजई हे अफगाणिस्तान चे राष्ट्रपती पदाची शपथ घेतली.
- २००८ : भारतीय गोल्फ खेळाडू जीव मिल्खा सिंह यांनी जपान दौरा खिताब जिंकला.
- २०१६ : पाकिस्तान इंटरनॅशनल एरलाईन्स चे पीके ६६१ विमान कोसळले. यात ४७ लोकांचा मृत्यू.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १८७९ : भारताचे क्रांतिकारक जतीन्द्रनाथ मुखर्जी यांचा जन्म.
- १८८९ : समाजशास्त्राचे विद्वान राधाकमल मुखर्जी यांचा जन्म.
- १९०२ : जनार्दन ग्यानोबा तथा 'जे. जी.' नवले - भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे पहिले यष्टिरक्षक (मृत्यू: ७ सप्टेंबर १९७९)
- १९२१ : प्रमुख स्वामी महाराज - स्वामीनारायण पंथातील अध्यात्मिक गुरू
- १९२४ : पोतुर्गाल चे मारियो सोरेस यांचा जन्म.
- १९४० : भारतीय चित्रपट निर्माता कुमार सहानी यांचा जन्म.
- १९५७ : जिऑफ लॉसन - ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १७८२ : १८ व्या शतकाचा वीर योद्धा हैदर आली यांचा जन्म.
- १८९४ : सुएझ कालव्याचे सहनिर्माते फर्डीनंट द लेशप्स यांचे निधन. (जन्म: १९ नोव्हेंबर १८०५)
- १९४१ : भास्कर रामचंद्र तथा भा. रा. तांबे कवी (जन्म: २७ आक्टोबर १८७४)
- १९७६ : डॉ. गोवर्धनदास पारिख विचारवंत आणि शिक्षणतज्ञ.
- १९८२ : बाबूराव विजापुरे - संगीतशिक्षक? (जन्म: १७ जून १९०३)
- १९९३ : इव्होरी कोस्ट आयलंडचे पहिले अध्यक्ष फेलिक्स हॉफॉएट-बोजि यांचे निधन. (जन्म: १८ ऑक्टोबर १९०५)
- १९९७ : ज्योतिर्मठाचे शंकराचार्य स्वामी शांतानंद सरस्वती यांचे अलाहाबाद येथील अलोपी आश्रमात निधन (जन्म: १६ जुलै १९१३ अच्छाती, बस्ती, उत्तर प्रदेश)
- २००४ : ॲमवे चे सहसंस्थापक जय व्हॅन ॲन्डेल यांचे निधन. (जन्म: ३ जून १९२४)
- २००३ : ला भारताचे पाचवे राष्ट्रपती फ़ख़रुद्दीन अली अहमद यांच्या पत्नी आणि भारतीय राजनीती मधील प्रसिद्ध बेगम आबिदा अहमद यांचे निधन.
- २०१३ : ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक विनय आपटे यांचे निधन.ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक विनय आपटे यांचे निधन.
- २०१६ : पाकिस्तानी गायक आणि इस्लाम धर्मप्रचारक जुनैद जमशेद यांचे विमान अपघातात निधन.

मातीची धूप थांबविण्यासाठी या उपाययोजना करा

हवामानातील बदलांचा मातीच्या भौतिक तसेच जैवरासायनिक गुणधर्मावर परिणाम झाला आहे. शेतीसाठी मातीचे आरोग्य अबाधित राखणे आवश्यक झाले आहे. मातीची भौतिक, रासाईच, जैविक धूप थांबविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे झाले आहे.

उपाययोजना :भौतिक धूप रोखण्यासाठी शेत जमिनीची बांधबंदिस्ती करणे आवश्यक आहे. उताराला आडवी पेरणी करावी. रासायनिक धूप कमी करण्यासाठी काळ्या जमिनीमध्ये जलसंधारणासाठी रुंद वरंबा सरी (बीबीएम) तंत्राने पेरणी करावी. एका आड एक सरी ओढावी. रासायनिक तसेच सेंद्रिय खतांचा संतुलित वापर करावा. जैविक धूप थांबविण्यासाठी पेरणीपूर्वी तसेच पेरणीच्यावेळी सेंद्रिय घटक, खतांचा उपयोग केल्यास जमिनीतील जिवाणूंची संख्या वाढण्यास मदत होते. पिकांना अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. जमिनीत हवा खेळती राहते. पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. सुदूर संवेदन व भौतिक माहिती प्रणाली प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली आहे. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांतील जमिनीचे प्रकार, जमिनीत उपलब्ध अन्नद्रव्यांची माहिती संकलित करण्यात आली आहे. विश्लेषण केले जात आहे. जमिनीच्या प्रकारानुसार पिकांची निवड, अन्नद्रव्ये व्यवस्थापनाच्या शिफारशी करण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होईल.

थोडक्यात

बीड : महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील पेठबीड भागातील पूर्णाकृती पुतळ्यास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी नगरसेवक गणेश वाघमारे, अशोक वाघमारे, जयश्रीताई विधाते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्ष संगीताताई वाघमारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते



बीड : महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमीत्त शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महात्मा फुले समता परिषद बीड च्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना ॲड. सुभाष राऊत राज्य अन्न आयोग अध्यक्ष महाराष्ट्र राज्य तथा प्रदेश उपाध्यक्ष समता परिषद. शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे, ज्ञानेश्वर राऊत, ऋषिकेश गनगे, मनोज वाघमारे आदीसह समता सैनिक उपस्थित होते.

बीड : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवसंग्रामच्या अध्यक्ष आदरणीय डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी आदरांजली अर्पण करत बीड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर आप्पा कोलंगडे, प्रदेश सरचिटणीस नितीनदादा लाटकर, जिल्हा सरचिटणीस अनिल भाऊ घुमरे,सौ. संगीताताई लाटकर, प्रसिद्धीप्रमुख मनोज जाधव, माजी बीड तालुकाध्यक्ष सचिन कोठुळे,सामाजिक न्यायचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे,बाजार समितीचे संचालक पंडित माने, शिवनीचे सरपंच विजय सुपेकर, वाहतूक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख आबेद, कामगार आघाडीचे बीड शहाध्यक्ष सलमान अली, बीड तालुका उपाध्यक्ष सुनील कुटे, शिवसंग्राम नेते गणेश धोंडरे,पिंटू भागडे अण्णासाहेब खोसे, युवा नेते शैलेश सुरवसे व अन्य शिवसंग्राम पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी भेदभाव करु नये

कारवाई न झाल्यास पुन्हा विद्रुपीकरण होईल ; जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारे होर्डिंग्ज काढण्यात यावेत.न काढल्यास शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी दि.०२.१२.२०२४ रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतूकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी अनाधिकृत होर्डिंग्ज काढण्यात यावीत म्हणून निदर्शने करून मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना निवेदन दिले होते.त्यानंतर मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या आदेशाने होर्डिंग्ज

काढण्यात आली.परंतु आज दि.०६ .१२.२०२४ वार शुक्रवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचे होर्डिंग्ज लावण्यात आलेले दिसले ते तातडीने काढण्यात यावेत अन्यथा शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना केली असुन अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी कारवाईत भेदभाव करण्यात येऊ नये तसेच याप्रकरणी कारवाई केली नाहीतर आणखी ईतर त्याठिकाणी होर्डिंग्ज लावतील.बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात संभाजी सुर्वे यांनी '' मी पुन्हा आलो'' घोषवाक्य असणारे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल होर्डिंग्ज लावले आहेत. मुख्यमंत्री महोदयांचे पुन्हा आल्या बद्दल अभिनंदन परंतु बीडकरांना छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पुन्हा विद्रुपीकरण नको आहे असे. आवाहन डॉ.गणेश ढवळे यांनी केले आहे.

तलाठी रुपचंद आभारे यांचे कार्य प्रेरणादायी - मोहन जगताप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील कोथाळा व माजलगाव सज्जाचे तलाठी रुपचंद आभारे यांच्या वाढदिवसानिमित्य आयोजित रक्तदान शिबिरात ३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. महात्मा फुले शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वही, पेन, स्केल ई.वाटप करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हा चेअरमन मोहन जगताप यांनी तलाठी रुपचंद आभारे यांचे प्रेरणादायी असुन प्रशासनात अश्या कर्मचारी व अधिकारी यांची कमतरता असल्याचे मनोगत व्यक्त केले.सदर कार्यक्रमास अध्यक्ष तहसीलदार संतोष रुईकर , प्रमुख पाहुणे नितीन नाईकनवरे,(मा. सभापती कृषी उ. बा. समिती,)संतोष यादव मा. संचालक कृ. उ. बाजार समिती ,कल्याण आबुज मा. सभापती जिल्हा परिषद ,ऍड. भानुदास डक अध्यक्ष वकील संघ,विजयादादा शिंदे मा. नगरसेवक ,कृष्णा थावरे सरपंच लिमगाव , रामराजे रांजवन अध्यक्ष सराफा संघ ,शरद यादव मा. नगरसेवक हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिगंबर सोळंके, रामराजे रांजवन, विशाल देवकते, मुळे, अनिल माने, नईम भाई शेख,बाळासाहेब अळागडे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, यांनी प्रयत्न केले.

शिक्षण रुपी शस्त्राने यश संपादन केलेले योद्धे डॉ.बाबासाहेब आंबेडकर-सत्यभामा मोरे

माजलगाव । प्रतिनिधी

श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन कार्यक्रम संपन्न. कार्यक्रमाची सुरूवात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.आहेर सर यांनी गायिलेल्या सामुहिक पद्या नंतर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु.आकांक्षा फपाळ, ने केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सत्यभामा मोरे म्हणाल्या की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना पुरुषांच्या प्रमाणे समान हक्क मिळावे.स्त्रियांचा सामाजिक ,राजकीय ,कायदेशीर दर्जा वाढवा यासाठी नेहमीच प्रयत्न केले. जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना भारताला

देऊन देशभर व जगभर आपली छटा उमटवली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ प्रामाणिकपणे, निष्ठा पूर्वक, अभ्यासातून व आचरणातून पुढे नेण्याचे दायित्व युवा पीढीवर आहे. मुख्याध्यापक संतोष लिंबकर समारोप करताना म्हणाले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक क्षेत्रात कार्य केले,सामाजिक समरसता,स्थापन करून सामाजिक विषमता नष्ट व्हावी,सर्वांना उत्तम जीवन जगता यावे, यासाठी अहोरात्र अनेक संस्कृत ग्रंथांचा अभ्यास,करून संविधान लिहिले.वैय्यक्तिक पद्य सागरिका टाकणखार, सूत्रसंचालन सोनम नाथरकर,आभार आर्या वाघमारे ने केले व्यासपीठावर मुख्याध्यापक संतोष लिंबकर प्रमुख पाहुण्या सत्यभामा मोरे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती अपर्णा मुळे,विभाग प्रमुख रवींद्र खोडवे, पर्यवेक्षक सदाशिव ढगे,इत्यादी मान्यवर उपस्थित होते सर्व शिक्षक व शिक्षका यांचे सहकार्य लाभले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही प्रेरणादायी-प्रकाश दुगड

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात रक्तदान शिबिर

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने श्री सिद्धेश्वर महाविद्यालय व एच.डी.एफ.सी. बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.डॉ. बाबाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही प्रेरणादायी असुन महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने महाविद्यालयात रक्तदान शिबिर हा उपक्रम स्तुत्य आहे. असे मत भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड यांनी व्यक्त केले.दि ०६ डिसेंबर रोजी प्रत्येक वर्षी हा उपक्रम श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात घेतला जातो ही अभिमानस्पद बाब आसे.एच.डी. एफ.सी.बँक शाखाधिकारी आशिष शर्मा यांनी म्हटले. महाविद्यालयात रक्तदान शिबीर उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी

जपून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अनोख्या पदतीने बाबसाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले जाते.असे मत प्राचार्य सुहास मोराळे यांनी मांडले.रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे.असे मत अभय कोकड यांनी मांडले स्था.कार्यवाह विश्वास जोशी यांनी आपल्या मनोगतात दातृत्वाची भावना देणाऱ्याने देत जावे,घेणाऱ्याने घेत जावे या विंदा करंदीकर यांच्या कवितेचा दाखला देऊन स्पष्ट केली.स्था.अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांनी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील पाटील आभार आणि शांतिमंत्र उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना सूत्रसंचालन डॉ. गवते यांनी केले. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि अनेक विध्यार्थी यांनी रक्तदान केले. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा.अंकुश साबळे, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, प्राध्यापक कर्मचारी,एच. डी. एफ.सी. बँकेचे मॅनेजर प्रसाद देशमुख,उपशाखा अधिकारी आशिष शर्मा,भक्ती साडेगावकर ,आरती माळी,नागेश थावरे,अभिजित देशमुख तसेच जीवनदायी ब्लड सेंटर बीडचे बाळू पवार व कर्मचारी स्टाफ उपस्थित होता.

जिल्ह्यात ठिकठिकाणी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन!

केएसपी विद्यालय

बीड: दि.०६/१२/२०२४ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन उत्साहात संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके यांनी मुलांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना बौद्ध ग्रंथांमधील महापरिनिर्वाण म्हणजे मृत्यूनंतरची मुक्ती, जन्म आणि मृत्यूच्या चक्रातून मुक्तीचे प्रतीक आहे. डॉ. आंबेडकरांची विचारधारा बौद्ध धर्माशी मिळतीजुळती आहे आणि त्यांचे अनुयायी त्यांना बौद्ध गुरू मानतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन म्हणजे संघर्ष, कर्तृत्व आणि यशाचा उत्तुंग प्रवास आहे. बाबासाहेबांनी सामाजिक भेदभाव आणि जातिव्यवस्थेचा प्रतिकार करत शिक्षणाच्या बळावर आपले स्थान निर्माण केले. हे फक्त भारताच्या संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते शिक्षणतज्ञ, अर्थतज्ञ, आणि मानवतावादी विचारवंत होते. त्यांनी समाजाच्या तळागाळातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर झगडले. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयी व महापरिनिर्वाण दिना बदल माहिती सांगण्यात आली.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच कार्यक्रमाचे मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरी करण्यात आला.

वसंतदादा पाटील महाविद्यालय

पाटोदा - येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन व

पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. न. पु. काळे यांनी केले. अभिवादन कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

बलभीम महाविद्यालय

बीड-प्रतिनिधी:- येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. ६ डिसेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभागाच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव भारतरत्न डॉ. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ.संतोष उंद्रे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, डॉ.संतोष डुबल, प्रबंधक पी.पी.डावकर, आयक्युएसी समन्वयक डॉ. अनिल चिंधे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. रवींद्र काळे, रा. से.यो.कार्यक्रमाधिकारी प्रा. गोविंद भोसले यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

व्यंकटराव देशमुख महाविद्यालय

बाभळगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक

मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महाविद्यालयाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी हणमंत शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात सुरुवात करण्यात आली. या अभिवादन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी भूषविले होते. कार्यक्रमाला प्रा. महारुद्र बिडवे, डॉ. शाहूराज मुळे, बाळासाहेब देशमुख, बालाजी देशमुख, क्रीडा संचालक डॉ.वैशाली माढेकर, प्रा.संतोष कल्याणकर, नितीन पाटील, श्रीमती देशमुख आर.एल., प्रा. नंदा खरटमल व महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

केएसके महाविद्यालय

बीड : सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापरिनिर्वाण दिना निमित्त प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून नम्र अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी डॉ.प्रेमचंद सिरसाट यांनी डॉ.बाबासाहेब

आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकताना म्हणाले की, डॉ.आबासाहेब आंबेडकर हे विश्वाचे आधारस्तंभ आहेत.त्यांनी शिक्षणाचा आदर्श घडविला.समाजातील दिन-दलित पिडीत लोकांसाठी मोठे कार्य केले. त्यामध्ये महिलांसाठी स्वातंत्र्य तसेच मंजूरमंत्री असताना मजुराच्या अडचणी लक्षात घेत त्या सोडविल्या व राज्यघटना निर्मितीसारखे महत्वाचे कार्य केले. यावेळी महाविद्यालयातील पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य काकडे एन.आर.,पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर, ड्रॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधिक्षक डॉ.विश्वांभर देशमाने आदी उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रेमचंद सिरसट यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.पल्लवी इरलापल्ले यांनी केले.तर आभार डॉ.अनिता शिंदे यांनी मानले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

विनायक प्राथमिक शाळेत

बीड: दि.५ डिसेंबर रोजी आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांचा ७ डिसेंबर रोजी वाढदिवस असल्यामुळे या वाढदिवसानिमित्त विनायक प्राथमिक शाळेत ५ डिसेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत शालेय स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे

उद्धघाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.किर्तीताई पांगारकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका वृंद उपस्थित होते.शाळेतील मुलांच्या सुप्त कला,गुणांना वाव मिळावा,त्यांच्यातील उपजत गुण समृद्ध होण्यासाठी मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय स्पर्धा घेऊन एक खुप चांगला उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेची संधी उपलब्ध करून दिली.शालेय स्पर्धेमध्ये वैयक्तिक स्पर्धा धावणे,ऊंच उडी, लांब उडी, लिंबू, चमचा,काव्यगायन,संगीत खुर्ची,कथाकथन,निबंधलेखन,चित्रकला, सांघिक खेळामध्ये खोखो,कब्बडी,प्रश्नमंजुषा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.शाळेतील सर्व मुला मुलींनी या स्पर्धेत सहभागी होऊन प्राविण्य मिळवावे असे आवाहन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.किर्तीताई पांगारकर यांनी केले आहे.

रस्ता दुरुस्तीच्या कामात एक कोटी ४४ लाखांचा भ्रष्टाचार

वडवणी सार्वजनिक बांधकाम कार्यालयातील प्रकार; संबंधित उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता आणि गुत्तेदार सर्वांची मिलीभगत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी सार्वजनिक बांधकाम कार्यालयाकडुन मागिल काही महीन्यापुर्वी तालुक्यातील तिनं चार रस्ते दुरुस्तीचे कामे ही काही ठिकाणी थातुर मातुर तर काही ठिकाणी तर कामे न करताच एक कोटी ४४ लक्ष रुपयांचा भृष्टाचार उघडकिस आला असुन याबाबत अनेक लेखी तक्रार असुन देखील त्याची कसलीही दखल न घेता संबधित अधिकारी, अभियंता आणी गुत्तेदार या सर्वांच्या संगणमताने शासनाच्या रक्कमेचा अपहार करण्यात आला असल्याचे उघडकिस आले आहे.

गेल्या काही महिन्यिपुर्वी वडवणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन तालुक्यातील रस्ता दुरुस्तीचे (रस्त्यावर इल खड्डे भरण्याचे) कामे करण्यात आलेली आसुन ही सर्व कामे संबंधित आधिकारी, अभियंते आणि गुत्तेदार यांच्या संगनमताने बोगस करण्यात आलेली आहेत . काही ठिकाणी थातुर मातुर कामे करुन तर काही काहिच कामे न करताच १ कोटी ४४ लक्ष रुपयांची या कामांची रक्कमही संबंधित गुत्तेदार आस वितरित करण्यात आलेली आहेत यामध्ये धाई फाटा देवडी ते अहिल्याबाई होळकर चौक वडवणी , वडवणी ते सोन्नाखोटा फाटा , चिखलबीड ते जिवाची वाडी – रक्कम ४९ लक्ष रुपये , ताडसोन्ना वडवणी धारुर ३९ लक्ष रुपये , परडिमाटेगाव , दुकडेगाव ते कुप्पा चौक ३० लक्ष रुपये पिंपळनेर घाटसावळी देवळा हिवरापहाडी ते जिवाचीवाडी २६ लक्ष रुपये आसे एकुण एक कोटी ४४ लक्ष रुपयांची रस्ता दुरुस्तीचे कामे ही कागदोपत्रीच करण्यात आल्याचे दाखवुन शासनाच्या करोडो रुपयाला चुना लावण्यात आला असुन या अपहारात अर्थिक गैरव्यवहातुन संबंधित आधिकारी, अभियंते आणि गुत्तेदार यांनी संगनमताने शासनाच्या लाखो रुपयांचा मलिदा लाटल्याचे जनतेतून बोलले जात आहे येथील काही रस्ते ही नवीन तयार करण्यात येणार होते हे संबंधित उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता यांना माहित असताना सुद्धा गुत्तेदार पोचण्यासाठी याच रस्त्याचे खड्डे बुजवण्याचे इस्टिमेट करून ते मंजूर करून घेऊन कागदपत्रे कामे पूर्ण झाल्याचे दाखवून लाखो रुपये हडप केल्याचे दिसून येते या कामाची रीतसर तक्रार असतानाही या मुजोर अधिकाऱ्यांनी तक्रारीची कुठलीच दखल न घेता गुत्तेदाराला बिल देण्यात आले असल्याचे दिसून येते स्वतःचे उकड पांढरे करून घेणाऱ्या गुत्तेदारासह या मुजोर अधिकार्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

अधिकाऱ्यांची सारवासारव

या रस्त्याची मला सखोल माहिती नाही तरीपण मी माहिती घेऊनआसा प्रकार झाला आसेल तर बघुन मी चौकशी करतो आणखी संबंधितांना ती कामे पुर्ण करण्यास सांगुन कारवाई करण्यात येईल –

श्री सी.पी. बोराडे, उप विभागीय अभियंता सा.बा वडवणी.

नवीन रस्त्याला मंजुरी असताना जुन्या रस्त्यावर खड्डे बुजवणे कशासाठी?

वडवणी ते पिंपरखेड हा रस्ताला नव्याने मंजूर झाला होता त्याची टेंडर ही निघाले असताना उपविभागीय अभियंता वडवणी व शाखा अभियंता यांनी गुतेदारांसोबत संगणमत करून याच रस्त्यावर मागील तारखेत खड्डे बुजवण्याचे काम काढले खड्डे न बुजविताच करोडो रुपयांचे मलिदा लाटला आता हाच रस्ता रुंदीकरणाचे कामं मंजुर असुन ते चालु आहे तरी संबंधित अधिकाऱ्यांना माहित असतानाही खड्डे बुजवण्याचा खटाटोप नेमका कशासाठी केला हा खरा प्रश्न आहे पण सर्वांच्या संगणमताने रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली शासनाचे लाखो रुपये हडप करण्यात आले असल्याचे दिसुन येत आहे.



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी उपस्थित शिवसेनेचे तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, युवानेते विनोद गूंड पाटील, युवानेते अजयजी गायकवाड सह सर्व उपस्थित होते.

आ.सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्रिमंडळात समाविष्ट करा –मनोज भागवत

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर कासार या तालुक्याचे दबंग आमदार माननीय सुरेश आण्णा धस यांना कॅबिनेट मंत्रिमंडळात स्थान द्यावे अशी मागणी सामान्य कार्यकर्त्यातून होत आहे. याच प्रामुख्याने कडा शहराचे व्यावसायिक मनोज भागवत यांच्यासह तालुक्यातील असंख्य लोकांची मागणी आहे. आष्टी पाटोदा शिरूर कासार या मतदारसंघात सुरेश धस हे सर्वाधिक मतांनी निवडून आलेले आहेत. त्यांची रांगडा नेता म्हणून सर्वसामान्यात ओळख असून त्यांनी त्यांच्या आमदारकीच्या काळात चांगले काम केलेले आहे. अशा माणसाला मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद द्यावे असे सर्वसामान्यांची इच्छा आहे. मनोज भागवत यांनीही मागणीला चोर धरला असून अण्णांना मंत्रिपद भेटावेच अशी ◀◀ पान ३ वर

अंबाजोगाई साहित्य संमेलनात होणार ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान

ज्येष्ठ नागरिकांना उपस्थित राहण्याचे संयोजकांनी केले आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

१४ आणि १५ डिसेंबर रोजी होणाऱ्या अंबाजोगाई साहित्य संमेलनातील जागर दिंडीचा विषय जेष्टांचा सन्मान असा आहे. हा सन्मान स्विकारण्यासाठी शहरातील सर्व ज्येष्ठ नागरीकांनी १४ डिसेंबर रोजी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनापुर्वी ३:३० वाजता उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य संमेलन संयोजन समितीचे वतीने करण्यात आले आहे.

१४ आणि १५ डिसेंबर २४ रोजी होणाऱ्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या अगदी सुरुवातीला काढण्यात येणाऱ्या जागर दिंडीत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शहरातील ज्येष्ठ नागरीकांचा सन्मान साहित्य संमेलनाच्या संयोजन समितीच्या वतीने करण्यात येणार आहे.

अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे मार्गदर्शन ज्येष्ठ पत्रकार लेखक अमर हबीब यांच्या कल्पनेतून या उपक्रमाचा जन्म झाला आहे. या साहित्य ◀◀ पान ३ वर

खळबळजनक : स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा; चौघांवर गुन्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गोरगरीब रुग्णांवरील उपचारासाठी आधारस्थान असलेल्या अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ठाणे आणि सुरत (गुजरात) मधील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

सध्याच्या खाजगी रुग्णालयातून मिळणाऱ्या महागड्या उपचारपद्धतीमुळे गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्ण स्वस्त आणि खात्रीपूर्वक उपचारासाठी स्वाराती रुग्णालयास प्राधान्य देतात. एका अर्थाने हे

रुग्णालय गोरगरिबांसाठी जीवनवाहिनी आहे. मात्र या रुग्णालयात महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधीचा पुरवठा केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले आहे. या प्रकरणी औषधी निरिक्षक मनोज पैठणे यांच्या फिर्यादीवरून सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी, जि.ठाणे),द्विती सुमित त्रिवेदी (रा. सुरत) आणि विजय शैलेद्र चौधरी (रा. मिरा रोड ठाणे) या चौघांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बनावट औषध निर्मिती आणि विक्रीच्या मागे आंतरराज्यीय टोळी असून अनेक राज्यात त्यांचे जाळे पसरले असण्याची शक्यता देखील फिर्यादीत व्यक्त करण्यात आली आहे. पुढील तपास एपीआय कांबळे करत आहेत.

सुरेश आण्णांना कॅबिनेट मंत्री पदाची संधी द्यावी; सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे - उपसरपंच बंडू सोले

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

राज्यात महायुतीला ऐतिहासिक असा विजय मिळाला आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघात च्या सर्वांगीण विकासासाठी अठरापगड जातीला सोबत घेऊन गोरगरीब सर्वसामान्यांच्या सुख दुखात धावून जाणारे आमदार सुरेश धस हे विधानसभेच्या चौथ्या टर्म ला ८० हजाराचे मताधिक्य घेऊन मोठ्या मताधिक्याने विजयी झालेले आहेत. विधानपरिषद वरही त्यांनी पाच वर्षे काम अत्यंत चांगल्या पद्धतीने केले असून सर्वसामान्यांना न्याय मिळण्यासाठी व महिला सुरक्षित राहण्यासाठी मतदारसंघातील शेतकरी सुखावला पाहिजे शाश्वत विकासासाठी

तरुणांच्या रोजगारासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस हे कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे आहे. यासाठी सुरेश आण्णा धस यांना कॅबिनेट मंत्रीपद देऊन मतदारसंघाला व मतदार संघातील नागरीकांना न्याय द्यावा अशी मागणी वाळुंज गावचे उपसरपंच बंडू सोले यांनी केली आहे पुढे बोलताना ते म्हणाले की

आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या गावागावांमध्ये रस्ते, वीज, पाणी देवस्थानचा विकास भक्तनिवास, तरुणांना रोजगाराची संधी, मतदान संघाच्या सर्वांगीण विकासासाठी विकासभिमुख नेतृत्व म्हणून सुरेश आण्णा धस यांची ओळख असून आमदार सुरेश धस हे लाडके नेतृत्व असून अठरापगड जातींना सोबत घेऊन चालणारा हा नेता आहे कोणत्याही परिस्थितीत न डगमगता कायम धाडसी निर्णय घेत आहेत अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत. वेळोवेळी पोटतिडकीने त्यांनी सभागृहात ◀◀ पान ३ वर

समाज बांधवांनी घटना अन् कायद्याचे पालन करावे –पो.नि.सुर्यतळ

माजलगाव । प्रतिनिधी

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला राज्यघटना व कायदा दिला आहे या गोष्टीचा समाज बांधवांनी पालन करून आपले जिवन जगले हीच खरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली असेल असे प्रतिपादन शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी काल महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित श्रावस्ती बुध्द विहार कार्यक्रमात केले

काल दि ०६ डिसेंबर शुक्रवार

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन येथील श्रावस्ती बुध्द विहार येथे सद्धधम सेवा संघाने आयोजित केला होता या कार्यक्रमाला पोनि राहुल सुर्यतळ यांच्या हस्ते महामानव च्या प्रतिमेचे पूजन करून बौद्ध वंदना घेण्यात आली व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ म्हणाले की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपणाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार घटनेने व कायद्याने दिला आहे सर्व समाज आज बाबासाहेब मुळे अतिशय चांगले जीवन जगत आहे मी पण आज त्यांच्या मुळेच या पदावर आहे समाजातील मुला, मुलींने उच्चशिक्षित होवून अधिकारी झाले पाहिजे तशी व्यवस्था राज्यघटनेत करुन ठेवली आहे त्याचा फायदा शिक्षण घेऊन केला ◀◀ पान ३ वर

भारत सरकार नोटरीपदी ॲड. अभिजीत गव्हाणे यांची निवड

आष्टी । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या विधी व न्याय विभागाने नुकतीच नोटरी नियुक्तीची यादी जाहीर केली असून यामध्ये आष्टी शहरातील प्रसिद्ध विधीज्ञ अँड अभिजीत शहाजी गव्हाणे यांची भारत सरकार नोटरी पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

वडील शहाजी गव्हाणे यांचे अँड अभिजीत हे चिरंजीव आहेत.शहाजी गव्हाणे हे आष्टी न्यायालयात गेल्या अनेक वर्षापासून वकिली व्यवसाय करत असून अँड अभिजीत गव्हाणे यांना

देखील शिक्षणाची प्रचंड ओढ असल्याने त्यांचे एल.एल.बी.चे शिक्षण बीड येथील विधी महाविद्यालयात झाले आहे.बीड येथील न्यायालयात १४ वर्षापासून वकिली व्यवसाय ते करत आहेत.त्यांना विधी क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवाचा व परिश्रमाचा फायदा झाला असून त्यांच्या याच कार्याची पावती म्हणून त्यांची भारत सरकार नोटरी पदी निवड करण्यात आली आहे.त्यांच्या या निवडीबद्दल राजकीय,सामाजिक, शैक्षणिक तसेच आदी क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

साडेतीन वर्षांच्या सानवीने पृथ्वीराज साठे यांना भेटण्यासाठी फोडला टाहो

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज विधानसभेच्या निवडणूकिसाठी उभा राहिलेले महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे हे अल्पशा मतांनी पराभूत झाल्यावर त्यांनी संपूर्ण मतदारसंघात आभार दौरा करत आहेत. या आभार दौऱ्यात मतदार संघातील संपूर्ण ग्रामीण भाग पिंजून काढत मतदारांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले. गुरुवार दि ५ रोजी अंबाजोगाई तालुक्यातील वरपगाव येथे जाऊन तेथील मतदारांचे आभार व्यक्त करून परत येत असतांना येथील सानवी दिगंबर पवार ही साडे तीन वर्षांची साठे काकांना मला भेटायचे आहे म्हणून तिन्हे अक्षरशः टाहो फोडला . काही केल्या तीचे रडणे थांबत नव्हते . गावाच्या जवळपास पाच किलोमीटर पुढे आल्यानंतर गावातीलच एका व्यक्तीकडून सानवी आपणास भेटण्यासाठी रडत असल्याचे समजताच त्यांनी आपली गाडी परत वळवत सानवीला भेटण्यासाठी वरपगाव येथे आले.

पृथ्वीराज साठे यांना पाहताच सानवी एकदम शांत झाली. गावकरी देखील हे दृश्य पाहून आश्चर्य चकित झाल्याचे दिसून आले. हे माझे साठे काका आहेत असे सानवीने म्हणताच पृथ्वीराज साठे हे देखील अत्यंत भावूक होऊन गहिवरून गेले. यावरून पृथ्वीराज ◀◀ पान ३ वर

मारहाणप्रकरणी महानगरपालिकेच्या स्वच्छता निरिक्षकावर गुन्हा दाखल

जालना । प्रतिनिधी

बांधकाम बंद करण्यासाठी धमकावत एका कामगाराला कॉलर पकडून मारहाण केल्याप्रकरणी जालना महानगरपालिकाचे स्वच्छता निरिक्षक गुलाब गावंडे यांच्यावर न्यायालयाच्या आदेशान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. ३ मे २०२४ रोजी घडली होती.

यासंदर्भात पोलीस सुत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, बेथलम (ता. जालना) येथील किशोर निर्मळ हे मजुरीचे काम करतात. ते दि. ३ मे रोजी येथील जवाहर बाग परिसरात एका शाळेच्या डागडूजीचे काम करीत होते. सकाळी १० वाजेच्या सुमारास स्वच्छता निरिक्षक गुलाब गावंडे हे त्या कामावर गेले आणि हे काम बंद कर, असे म्हणुन धमकावत त्यांनी किशोर निर्मळ यांना चापटा–बुक्यांनी मारहाण केली होती. तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली होती. त्यानंतर श्री. निर्मळ यांनी पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदविली असता अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला होता. तसेच श्री. निर्मळ यांनी घडलेल्या प्रकाराची महापालिकेकडेही तक्रार केली ◀◀ पान ३ वर

शासकीय कार्यालयात संत संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी करा : शासनाचे आदेश

जालना । प्रतिनिधी

श्री. संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती रविवारी दि.८ डिसेंबर रोजी सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने परित्रक काढले आहे. त्यामुळे तालुक्यातील व ग्रामीण भागातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात यावी असे आवाहन तेली युवक संघटना व जालना जिल्हा प्रांतिक तैलिक महासभाच्या वतीने करण्यात आले आहे. सदुंबरे जिल्हा पुणे येथील श्री संताजी जगनाडे महाराज हे तुकाराम म हाराजांच्या चौदा टाळकऱ्यातील प्रमुख टाळकरी होते. तसेच तुकाराम महाराजांची मुळ गाथा पाण्यात टाकण्यात आली होती. ती संपूर्ण गाथा श्री. जगनाडे महाराजांना मुखोद्रत होती. त्यांनी ही गाथा पुन्हा लिहून काढली.

त्यामुळे श्री. संताजी जगनाडे महाराजांना मानणारा मोठा वर्ग संपूर्ण महाराष्ट्रात आहे. रविवारी (दि.०८) संताजी महाराजांचा जन्म दिवस साजरा करण्यात येतो. यासंदर्भात गेल्या दोन वर्षी पासून महाराष्ट्र शासनाने परित्रकात उल्लेख केला आहे. यंदाही महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी संदर्भात परिपत्रक जारी केले असून यामध्ये सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालयात ८ डिसेंबरला संताजी महाराजांची जयंती साजरी करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात ही जयंती साजरी करण्यात यावी असे आवाहन तेली युवक संघटना व जालना जिल्हा प्रांतिक तैलिक महासभाच्या वतीने करण्यात आले आहे.

संविधानाचा जागर करुन बाबासाहेबांना दिली मानवंदना–जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त मा. सभापती तथा नगरसेविका सौ. जयश्री विलास विधाते यांनी भारतीय संविधानातील प्रास्ताविकेचे सामुहिक पठण तसेच प्रतीचे वितरण करून महामाववास मानवंदना दिली.

गेली कित्येक वर्षांपासून संविधान मनामनात संविधान घराघरात, असा संकल्प करुन संविधानाच्या शेकडो तर प्रास्ताविकेच्या हजारो प्रती महापुरुषांच्या जंयती पुण्यतिथी राष्ट्रीय सण, राजकीय सामाजिक व कौटुंबिक समारंभ,वाढदिवस लग्न अशा प्रसंगी भेट म्हणून आजवर साडेसातशे संविधानाच्या तर दहा हजार प्रास्ताविकेच्या प्रती वितरीत केल्या असून हा उपक्रम अजीवन राबविण्याचा त्यांचा मानस आहे. आजही भारतीय संविधान जनसामान्यांपर्यंत पोहचलेल नाही तेंव्हा प्रत्येक भारतीयाला संविधान समजल पाहिजे. हक्क–कर्तव्य उमजली पाहीजेत आणि आम्ही भारतीय ही भावना दृढ झाली पाहिजे. असा त्यांचा प्रयत्न असुन महामानवाच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त त्यांनी सामुहिक पठनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या प्रसंगी वर्षा केंडे मॅडम, संजीवनी पोकळेताई, मा. सभापती प्रेमलताताई चांदणे,प्रा. संगीता शिंदेताई, राणी सानप मॅडम, निशा पवळताई, ललीता भोसलेताई यांच्यासह परिसरातील बहुसंख्य महिला भगीनी उपस्थित होत्या.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पिंपरी चिंचवडला मंत्री पद हवंचं'; शहर भाजपने मांडला लेखाजोखा, मंत्रीपदासाठी पदाधिकाऱ्यांची आग्रही भूमिका

पिंपरी । प्रतिनिधी

राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची आणि दोन उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधी नंतर आता मंत्रिमंडळ विस्तारात वर्णी लागावी यासाठी लॉबिंग सुरु झाल्याचं चित्र राज्यभरात दिसून येत आहे. यासाठी आता पिंपरी चिंचवड भाजपने दबाव आणायला सुरुवात केली आहे. शहराला मंत्रीपद मिळावं यासाठी भाजप पदाधिकाऱ्यांनी थेट विधानसभेचा लेखाजोखा मांडला आहे. त्याचबरोबर आजवर शहराला न मिळालेलं मंत्रीपद यंदा मिळायला हवंचं अशी आग्रही भूमिका शहर भाजपने घेतली आहे. राज्यातील २८५ मतदारसंघाच्या तुलनेत पिंपरी, चिंचवड आणि भोसरीत आम्ही बूथ लेव्हल वर सर्वोत्तम कामगिरी केली आहे. याचा लेखाजोखा पदाधिकाऱ्यांनी यावेळी मांडला आहे. ही कामगिरी पाहता शंकर जगताप आणि महेश लांडगे या दोघांपैकी एकाला मंत्रीपद द्यायला हवं, अशी दबावाची खेळी शहर भाजपने खेळली आहे.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये पिंपरी, चिंचवड, भोसरी तीन विधानसभा येतात. लोकसभा निवडणुकीला इथे महायुतीच्या उमेदवारांना चिंचवड मधून ७६ हजारांची आघाडी दिली. पिंपरी मधून १६००० मताची आघाडी दिली. भोसरीमधून ९००० मताच्या आघाडी दिली आणि त्यानंतर इथं शंकर जगताप अध्यक्ष झाल्यानंतर जी स्मूथ लेवलला किंवा खालच्या स्तरापर्यंत बुथ स्तरावर, शक्ति केंद्र मंडळ , आणि संघटनात्मक जी ताकद वाढली ती लोकसभेमध्ये दिसून आली. परवा झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये दिसून आली. तिन्हीही आमदार भारतीय जनता पार्टीने अथक परिश्रम करून कार्यकर्त्यांना तिन्ही आमदारला विजय केलं. पक्षाने जे नियोजन केलं ते शंकरराव जगताप यांच्या अध्यक्ष असलेल्या संघटने खाली केलं गेलं. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या अशी मागणी आहे. आत्तापर्यंत कधीच मंत्री पद नाही मिळालं. तर पिंपरी चिंचवड शहरात तिन्ही आमदारांनी दिल्यामुळे आम्हाला पिंपरी चिंचवड शहराला एक भारतीय जनता पार्टीच्या श्रेष्टीने मंत्रीपद द्यावं अशी कार्यकर्त्यांची तमाम इच्छा आहे, अशी भूमिका भाजप पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे.

मंत्रिमंडळाचा विस्तार विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनापूर्वी

राज्यातील मंत्रिमंडळाचा विस्तार विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनापूर्वी करण्यात येईल, असे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल शपथविधीनंतर झालेल्या पहिल्याच पत्रकार परिषदेत दिले आहेत. त्यानुसार राज्यातील मंत्रिमंडळाचा विस्तार हा पुढील आठवड्यात म्हणजेच ११ किंवा १२ डिसेंबरला होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील हिवाळी अधिवेशनाला १६ डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरूवात होणार आहे, त्यापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात येणार असल्याची माहिती महायुतीतील नेत्यांनीही माध्यमांशी बोलताना दिली आहे. त्याआधी महायुतीतील पक्षांनी आपापल्या पक्षांतील बड्या नेत्यांसोबत बैठका चर्चा सुरू केल्याचं चित्र दिसून येत आहे.

मोरवाडी, मोशी येथील न्यायालयाच्या बांधकामाची जिल्हा न्यायाधीश महाजन यांच्याकडून पाहणी

पिंपरी पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट अससोसिएशन यांनी मागील आठवड्यात जिल्हा न्यायाधीश महाजन यांना भेटून मोशी न्यायालयाचे ांधकाम नियोजित वेळेत पूर्ण व्हावे व मंजूर असलेली दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर व सत्र न्यायालय तसेच मोटार वेहिकल कोर्ट लवकरात लवकर चालू करणे संदर्भात निवेदन दिले होते. त्यासंदर्भात शुक्रवारी दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी मोरवाडी कोर्ट येथे नव्याने चालू करण्यात येणारे सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरच्या मोरवाडी व मोशी येथील न्यायालयाचे बांधकामाची पाहणी जिल्हा न्यायाधीश मे.महाजन साहे आणि मे.मोरे साहेब यांनी केली. यावेळी पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशनचे अध्यक्ष व कार्यकारणी उपस्थित होते. यावेळी मा. अध्यक्ष नारायण रसाळ,मा.अध्यक्ष सुनील कडुसकर मा.अध्यक्ष किरण पवार मा.अध्यक्ष प्रमिला गाडे, प्रतीक जगताप, ॲड.तेजस चवरे, ॲड.पल्लवी कुऱ्हाडे, तुषार खरात, नारायण थोरात, ॲड.विजय भगत, ॲड. शांताराम दामगुडे, ॲड.ओमकार नानेकर आदी वकील वर्ग हजर होते. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. पांडुरंग विठ्ठल शिनगारे, उपाध्यक्ष ॲड. अजय रामसुमेर यादव, सचिव ॲड. संदिप भाऊसाहेब तापकीर, महिला सचिव ॲड. संगीता रमेश कुशलकर, सहसचिव ॲड. पदमावती लक्ष्मण पाटील, खजिनदार ॲड. विशाल आसाराम पोळ, हिशोब तपासनीस ॲड. प्रेरणा हरेश चंदानी, तसेच सदस्य ॲड. विजय धोंडिराम भोंडे, ॲड. अक्षय कमलाकर चौधरी, ॲड. आरती दत्तात्रय कुलकर्णी, ॲड. पौर्णिमा भगवान मोहिते, ॲड. रूपाली रामचंद्र पवार , ॲड. सुषमा सुदर्शन पाटील वकील वर्ग उपस्थित होते.

भोरमध्ये सहा महिन्यांत ९७ जणांना सर्पदंश

महुडे, : भोर तालुक्यात भात हेच प्रमुख पीक असून भात काढणीची कामे जवळपास उरकली आहेत. भात शेतीच्या कामासाठी शेतकरी सर्वात जास्त वेळ शेतात राबत असल्याने याच काळात सर्पदंशाच्या घटना वाढ आहेत. मागील सहा महिन्यांत भोर तालुक्यात ९७ सर्पदंशाच्या घटना घडल्या असल्याची नोंद असून त्यातील ८९ जणांवर भोरमध्येच उपचार केले. आठ जणांना पुढील उपचारासाठी पुणे येथे पाठविले. सर्पदंशाच्या एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नसल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

भोर तालुका डोंगर झाडांनी व्यापलेला असून पाऊसही अधिक असतो. पावसावर अवलंबून असणारी भातशेती केली जाते. पावसाळ्यात जमीन पाण्याखाली जात असल्याने सरपटणारे प्राणी जमिनीवर येतात. त्यामुळे शेतीच्या पेरणी, लावणी व कापणीच्या वेळी शेतकऱ्यांना सर्वाधिक सर्पदंश झाल्याचे निदर्शनास येते. याच सहा महिन्यांच्या कालावधीत सर्वाधिक २७ सर्पदंश हे जुलै महिन्यात झाले. तर जूनमध्ये १४, ऑगस्टमध्ये २०, सप्टेंबरमध्ये १३, आक्टोंबरमध्ये १५, तर नोव्हेंबरमध्ये ८ अशा एकूण ९७ जणांना सर्पदंश झाले आहेत. यातील ९४ जणांनी उपचारासाठी भोरच्या उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली. त्यातील ८६ रुग्णांवर भोर उपजिल्हा रुग्णालयात उपचार केले. तर ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात तीन (आरोग्य केंद्र भुतोंडे येथे एक व भोंगवली येथे दोन) अशा एकूण ८९ रुग्णांवर तालुक्यात उपचार केले. याव्यतिरिक्त उपजिल्हा रुग्णालयातून आठ रुग्णांना पुढील उपचारासाठी पुण्याच्या ससून रुग्णालयात पाठविले. भोर तालुक्यातील पंचायत समितीअंतर्गत असलेल्या सात आरोग्य केंद्रात मागील सहा महिन्यांत १४ सर्पदंशाचे रुग्ण गेले होते. यापैकी ११ रुग्णांना भोरच्या उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. तर तीन जणांना आरोग्य केंद्रातच उपचार केले.

कोट्यावधीचा कर थकल्याने सिंहगड इंस्टिट्यूटच्या २६ इमारती जप्त

पुणे । प्रतिनिधी

सिंहगड इंस्टिट्यूटने पुणे महापालिकेचा ४७ कोटी ४३ लाख रुपयांचा मिळकतकर थकविला असून, न्यायालयदेखील थकबाकीची रक्कम त्वरित भरावी असे आदेश दिलेले आहेत. तरीही अनेक महिने न भरल्याने एरंडवणे भागातील संस्थेचे मुख्य कार्यालयासह २६ इमारती जप्त करण्यात आल्या आहेत. एका महिन्याच्या आत ही पूर्ण रक्कम न भरल्यास या इमारतींचा लिलाव करून रक्कम वसूल केली जाईल अशा इशारा दिला आहे. मिळकतकर विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी ही माहिती दिली.

सिंहगड इंस्टिट्यूटची पुण्यात आंबेगाव बुद्रूक, कोंढवा बुद्रूक, एरंडवणे येथे महाविद्यालय, शाळा आहेत. या इमारतींचा मिळकतकर गेल्या पाच वर्षापासून भरण्यात आलेला नाही. पुणे महापालिकेने ही थकबाकीची रक्कम भरावी यासाठी नोटीस बजावली होती. पण त्यास नकार देत संस्थेने महापालिकेच्या विरोधात याचिका दाखल केली होती. न्यायालयात झालेल्या सुनावणीमध्ये महापालिकेने केलेली कारवाई योग्य आहे, संस्थेने त्यांची थकबाकी भरावी असे आदेश दिले होते. तरीही गेल्या वर्षभरापासून संस्थेने थकबाकी भरली नसल्याने थकबाकीचा आकडा वाढत ४७ कोटी ४३ लाखापर्यंत गेला आहे.

पुणे महापालिकेने दोन डिसेंबरपासून मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी मोहीम सुरु केली आहे. थकबाकीदारांच्या इमारतीसमोर बँड वाजवून कर वसूल केला जात आहे. याच मोहिमेअंतर्गत आज सिंहगड इंस्टिट्यूटच्या एरंडवणा येथील मुख्यालयासह २६ इमारतींची जप्ती करण्याची नोटीस बजावली आहे. ३० दिवसाच्या आत मिळकत कराची रक्कम न भरल्यास या मिळकतीचा लिलाव केला जाणार आहे, असे माधव जगताप यांनी सांगितले. दरम्यान, सध्या केवळ इमारती जप्त केल्या आहेत, त्यांना टाळे लावलेले नाही. त्यामुळे तेथील कार्यालय व शैक्षणिक कामकाज सुरु राहील. पण एका महिन्यात संस्थेने पैसे भरले नाहीत तर इमारतींबाबत पुढील कारवाई करावी लागेल, असेही जगताप यांनी सांगितले.

थकबाकी वसुली १४.१४ कोटी

गेल्या पाच दिवसापासून थकबाकी वसुलीसाठी मोहीम सुरु केल्यानंतर १६५ मिळकतींसमोर बँड वाजवून १४ कोटी १४ लाख २६ हजार २१२ रुपये इतकी थकबाकी वसूल केली आहे. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे चार महिने शिल्लक आहेत. या कालावधीत अर्थसंकल्पातील २७०० कोटीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महापालिकेने कंबर कसली आहे. १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत बँड वाजवून पैसे वसूल केले जात आहेत.

पद्मश्री डॉ. मनोहर डोळे यांचे निधन

पुणे : पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सर्वात पहिला पदमश्री पुरस्कार मिळालेले डॉ.मनोहर कृष्णाजी डोळे (वय ९७) यांचे शुक्रवारी (दि. ६) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगी व दोन मुले व नातवंडे असा परिवार आहे.

डॉ.डोळे यांचा जन्म १९२८ साली झाला असून त्यांचे वैद्यकीय क्षेत्रात मोठे कार्य आहे.१९९२ साली त्यांनी निमदारी येथे आदिवासी मुलांसाठी वसतिगृहाची स्थापना केली. गरीब रुग्णांसाठी मोहन ठुसे नेत्र रुग्णालय त्यांनी नारायणगाव येथे १९८२ साली केले.कबड्डी खेळाचा त्यांना जास्त छंद होता. त्यांना आजवर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला न्याय देणारा एक आरोग्य दूत आपल्यातून हरपला त्यांच्या निधनाने जुन्नर तालुक्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रामध्ये पोकळी निर्माण झाली आहे, अशी प्रतिक्रिया जुन्नर चे आमदार शरद सोनवणे यांनी व्यक्त केली आहे. माजी आमदार अतुल बेनके, विघ्नहर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, शिक्षण महर्षी अनिल मेहेर आदींनी त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली आहे.

'तो' खून प्रेम प्रकरणाच्या संशयावरून

पिंपरी । प्रतिनिधी

एका नातेवाईक महिलेशी प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून एका तरुणाचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला होता. ही घटना गुरुवारी (दि. ५) सायंकाळी पावणे सात वाजताच्या सुमारास चर्होली येथे घडली. अवघ्या १२ तासांच्या आता पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने एका आरोपीला अटक केले असून एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले आहे.

सचिनकुमार लखीदर राय (वय २३, रा. बंगरी, जि. मुझफ्फरपुर, बिहार) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. गौतम रामानंद राय (वय २२, रा. तेजस रेसीडन्सी, मंगलनगर, वाकड. मूळगाव मु. बंगरी पो. मरवन ता. काटी जि. मुजफ्फरपूर, राज्य-बिहार) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर त्याचा अल्पवयीन साथीदार (वय १७ वर्ष ६ महिने, रा. मोहीतेवाडी, ता. मावळ, जि. पुणे) यालाही पोलिसांनी

ताब्यात घेतले आहे. खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, चर्होली येथे सचिनकुमार राय याचा खून झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार खंडणी विरोधी पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आसपासचे सीसीटीव्ही तपासले असता त्यावरून आरोपी गौतम राय याचे नाव निष्पन्न केले. पोलीस हवालदार आशिष बोटके यांना मिळालेल्या माहितीवरून आणि सहायक फौजदार सुनील कानगुडे यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणावरून काळाखडक, वाकड येथून पहाटे सव्वातीन वाजताच्या सुमारास आरोपीला ताब्यात घेतले. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेतले.

प्रेम संबंध असल्याचा संशय

मयत सचिनकुमार राय याचे आरोपीया नातेवाईक महिलेशी प्रेमसंबंध असल्याचा संशय आरोपीला होता. या कारणावरून नातेवाईक महिलेने घरही सोडले होते. त्यामुळे सचिनकुमार याला धडा शिकविण्यासाठी त्याचा खून केल्याचे आरोपीने पोलिसांना सांगितले. खंडणी विरोधी पथकाने आरोपीला दिघी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. ही पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह आयुक्त, डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदिप डोईफोडे, सहायक आयुक्त बाळासाहेब कोपनर, डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, सहाय्यक फौजदार सुनील कानगुडे, अंमलदार प्रदीप गोडांबे, आशिष बोटके, चंद्रकांत जाधव, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, मंगेश जाधव तसेच तांत्रिक विश्लेषण विभागातील नागेश माळी यांच्या पथकाने केली आहे.

पुण्याच्या पालकमंत्रीपदावरुन महायुतीत रस्सीखेच; राष्ट्रवादीवाले आग्रही

पुणे । प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तर उपमुख्यमंत्रीपदी शिवसेना नेते एकनाथ शिंदे, व राष्ट्रवादीच्या अजित पवार यांनी शपथ घेतली. त्यामुळे, आता मंत्रिमंडळ विस्ताराकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. तसेच, कोणाला कोणत्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळणार याचीही चर्चा रंगली आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईनंतर राज्यातील वेगाने वाढणारं शहर म्हणून पुणे (झींपश) शहराची देशभरात ओळख आहे. आयटी हब, सर्व्हिस सेक्टर, शैक्षणिक पंढरी आणि स्थलांतरीतांचे माहेरघर बनत असलेल्या पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरुन आता चर्चा सुरू झाल्या आहेत. अजित पवार (-क्षळीं ुिरी) की चंद्रकांत पाटील या नावांमध्ये सध्या पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरुन दोन्ही पक्षांतील नेत्यांकडून दावा केला जात आहे.

पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी भाजपच्या कार्यकर्त्यांकडून आणि अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांकडून आमच्याच नेत्याला संधी देण्यात यावी, अशी इच्छा व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे दोन्ही पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून तशा मागणीला जोर देखील धरला जातोय. याबाबत, भाजप नेते चंद्रकांत पाटील यांना विचारलं असता, महायुतीत जर काही झालं तर समजूतदारपणा दाखवायला हवा, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. तर अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी अजित पवारांना पालकमंत्री करावं अशी मागणी केली आहे. त्यामुळे, पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरुन महायुतीमध्ये रस्सीखेच पाहायला मिळणार आहे. दरम्यान २००४ पासून अजित पवार हे पुणे शहरासाठी आणि पुणे जिल्ह्यासाठी सक्रिय आहेत, त्यांना जिल्ह्यातील राजकीय व प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे. याशिवाय त्यांची प्रशासनावर मोठी पकड देखील आहे, त्यामुळे अजित पवारांनाच पालकमंत्री करावं अशी मागणी प्रदीप गारटकार यांनी केली आहे. तर, भाजप नेतेही येथील पालकमंत्रीपदासाठी आग्रही असल्याचं दिसून येतं. कारण, पुणे जिल्ह्यात भाजपचे मोठ्या प्रमाणात आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे, जिल्ह्याचे पालकत्व भाजपकडेच राहिल्यास कार्यकर्त्यांना आनंद व कामे मार्गी लावण्यासाठी कुठलीही अडचण येणार नाही, असे कार्यकर्त्यांना वाटते. विशेष म्हणजे अजित पवार स्वत: येथील पालकमंत्रीपदासाठी आग्रही राहतील, कारण यापूर्वीही त्यांनी आवर्जून येथील पालकमंत्रीपद आपल्याकडेच ठेऊन घेतले. महायुतीमध्ये सहभागी झाल्यानंतर अजित पवार उपमुख्यमंत्री बनले. मात्र, पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची धुरा त्यांच्याकडे नव्हती. मंत्रिमंडळ विस्तारानंतर भाजपकडून ते पालकमंत्रीपद आपल्याकडे घेण्यात अजित पवारांना यश आल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, यावेळीही दावेदार म्हणून अजित पवार यांच्याकडेच पाहिलं जात आहे.

माझ्यासोबत आली नाहीस, तर तुझ्या आईचे घर जाळून टाकेन'; जावयाने सासूच्या घराला लावली आग

पुणे । प्रतिनिधी

पत्नी माहेरी गेल्याच्या कारणावरून जावयाने चक्क सासुरवाडीतील घरालाच आग लावल्याचा धक्कादायक समोर आला आहे. या घटनेत घरातील काही साहित्य जळाल्याने नुकसान झाले. ही घटना कोथरूडमधील सुतारदरा परिसरात गुरुवारी (ता. ५) मध्यरात्री घडली.

या प्रकरणी सासूने कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी जावई साहिल हनुमंत हाळंदे (वय २५, रा. भूगाव, ता. मुळशी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साहिलचा पत्नीशी वाद झाला होता. त्यामुळे पत्नी रागाच्या भरात बुधवारी रात्री माहेरी निघून गेली. त्यामुळे साहिल गुरुवारी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास सासुरवाडीत गेला. त्याने पत्नीला 'मी तुझ्या घराजवळ आलो आहे. तू पाच मिनिटांत माझ्यासोबत घरी आली नाहीस, तर तुझ्या आईचे घर जाळून टाकेन', अशी धमकी दिली. त्यानंतर साहिलने सासूच्या घराला आग लावली. त्यात घरातील साहित्य जळाल्याने नुकसान झाले. याबाबत माहिती मिळताच परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम, विशेष शाखेचे सहाय्यक आयुक्त विठ्ठल दबडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप देशमाने, पोलिस निरीक्षक (गुन्हे) विक्रमसिंह कदम, पोलिस निरीक्षक सीमा ढाकणे यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक संदीप पवार करीत आहेत.

भरधाव ट्रकने दुचाकीवरील महिलेस चिरडले; वराळे हद्दीतील घटना

खेड । प्रतिनिधी

भरधाव ट्रकची पाठीमागून दुचाकीस जोराची धडक बसल्याने झालेल्या अपघातात एक महिला जागीच ठार झाली. ही घटना खेड तालुक्यातील वराळे गावच्या हद्दीतील स्पिनी कंपनीजवळ बुधवारी (दि. ४) सकाळी सातच्या दरम्यान घडली. संबंधित महिलेने दुचाकीस्वारास लिफ्ट मागितली होती. ही लिफ्ट तिच्या जिवावर बेतली. महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांनी याप्रकरणी ट्रकचालकावर गुन्हा दाखल केला आहे.

कविता देवकर (वय ३०) असे या अपघातात जागीच ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. कविता यांना लिफ्ट देणारा दुचाकीस्वार बालाजी राठोड (वय ४०) यांनी याप्रकरणी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दत्तात्रय मल्लिकार्जुन लोखंडे (वय ४६, रा. सोलापूर) याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, बालाजी राठोड हे बुधवारी सकाळी सातच्या दरम्यान आंबेठाण येथून त्यांच्या मोटरसायकल वरून पुढे वराळे गावाकडे जात होते. त्या वेळी कविता देवकर यांनी लिफ्ट मागितली. राठोड यांनी कविता यांना दुचाकीवर पाठीमागे बसवून आंबेठाण बाजूकडून वासुली फाट्याकडे जाण्याच्या प्रयत्न होते. त्या वेळी त्यांची दुचाकी वराळे गावच्या हद्दीतील स्पिनी कंपनीजवळ आली असता पाठीमागून भरधाव आलेल्या ट्रकची त्यांच्या दुचाकीस जोरात ठोस बसली. या वेळी ट्रकच्या डाव्या बाजूचे पुढील चाक कविता यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ट्रकचालक लोखंडे याच्यावर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन गीते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संतोष गिरणार हे याप्रकरणी तपास करीत आहेत.

दीनमित्रकार मुकुंदराव पाटील राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार राधेश्याम जाधव यांना जाहीर

पुणे : सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीच्या वतीने देण्यात येणारा दीनमित्रकार मुकुंदराव पाटील राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार या वर्षी द हिंदू वृत्तपत्र समूहातील सह-संपादक राधेश्याम जाधव यांना देण्यात येणार आहे, अशी माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी दिली.

नेवासा तालुक्यातील तरवडी येथील दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीच्या वतीने सत्यशोधक विचारांशी बांधिलकी असणाऱ्या पत्रकारास दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीच्या वतीने १९९५ पासून दरवर्षी पुरस्कार दिला जातो. या वर्षीच्या पुरस्कारांची घोषणा समितीचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग व सचिव उत्तमराव पाटील यांनी केली

अहमदनगर जिल्हात तरवडी येथून मुकुंदराव पाटील यांनी 'दीनमित्र' हे सत्यशोधक नियतकालिक ५८ वर्षे चालविले. त्यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार जाधव यांना त्यांच्या लेखन आणि संशोधनात्मक मांडणीसाठी देण्यात आला आहे. शेती अर्थकारण, शेतमजुरांचे प्रश्न, महिला शेतकरी आणि त्यांचे प्रश्न यांची सखोल मांडणी त्यांनी आपल्या लेखनातून केली आहे. दुष्काळग्रस्त भागातील महिला शेतकरी आणि साकारात्मक संघर्ष हा त्यांच्या संशोधनाचा आणि अभ्यासाचा विषय आहे. पत्रकारिता आणि संवादशास्त्र या विषयात ते पी. एच . डी धारक आहेत. यापूर्वी दीनमित्रकार मुकुंदराव पाटील राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने ज्ञानेश महाराव, संजय आवटे, संध्या नरे-पवार, विजय चोरमारे, सचिन परब यांना सन्मानित करण्यात आले आहे. या वर्षीच्या पुरस्कारांचे वितरण रविवारी २२ डिसेंबरला तरवडी येथे कॉ भालचंद्र कांगो यांच्या हस्ते होणार आहे.